

रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १६ ◆ अंक १३८
www.ramprahar.com

# राम प्रहर

मंगळवार, ५ डिसेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

पनवेलमध्ये दुकानदारांकडून आता मराठीत नामफलक/२
पनवेल-कर्जत प्रवास लवकरच होणार सुसाट/६
नवोदित मुंबई श्री स्पर्धेत अक्षय गवानेला सुवर्णपदक/८

# नौदलाच्या गणवेशावर शिवरायांची राजमुद्रा

## पंतप्रधान मोदींची घोषणा; राजकोट किल्ल्यावर पुतळ्याचे अनावरण

**मालवण : प्रतिनिधी**

नौसेनेच्या ध्वजाला मागच्या वर्षी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांशी जोडता आले हे माझे भाग्य आहे. आता नौदलाच्या गणवेशावर शिवरायांची राजमुद्रा असेल आणि नौदलाच्या पदांना भारतीय परंपरेची नावे देणार असल्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी (दि.४) केली. ते मालवणजवळील तारकर्ली येथील नौदल दिन कार्यक्रमात



बोलत होते. या वेळी राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले.

या कार्यक्रमास संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, उद्योगमंत्री नारायण राणे, राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, मंत्री उदय सामंत, दीपक केसरकर, आदिती तटकरे, नौदलाचे अधिकारी, लोकप्रतिनिधी उपस्थित होते. या वेळी नौदलाकडून चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.

भारताचा इतिहास विजय, शौर्य, ज्ञान आणि विज्ञान यांचा आहे. आपल्या समुद्री सामर्थ्याचा इतिहास आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमार उभे केले आणि दर्यातील शत्रूंना धाकात ठेवले, असे सांगून पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज एक मोठी ताकद भारताच्या मागे आहे आणि ती ताकद १४० कोटी लोकांच्या विश्वासाची आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, उद्योगमंत्री नारायण राणे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही विचार मांडले.

# आमदार प्रशांत ठाकूर, पत्नी वर्षा ठाकूर यांच्याकडून अवयवदानाचा स्तुत्य संकल्प

## सरकारी अभियानात ऑनलाईन नोंदणी; लोकप्रतिनिधींसमोर आदर्श

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मानवता हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे हे सिद्ध करणारी कृती म्हणजे अवयवदान. याच भावनेतून पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आणि त्यांच्या पत्नी वर्षा ठाकूर यांनी मरणोत्तर अवयवदानाचा संकल्प केला. त्यांनी केंद्र सरकारच्या अभियानामध्ये ऑनलाईन नोंदणी करून एक आदर्श वस्तुपाठ ठेवला आहे. त्याचबरोबर इतरांनासुद्धा अवयवदानाचे आवाहन केले आहे.

मृत्यू हे आपल्या आयुष्यातील चिरंतन सत्य आहे, जे कधीही बदलता येऊ शकत नाही, परंतु त्या अनुषंगाने आपण समाजातील अनेक गरजूंच्या आयुष्यात आनंद फुलवून त्यांचे जीवन प्रकाशमय करू शकतो याची जाणीव फारच कमी लोकांना आहे. शरीर हे क्षणभंगूर आहे. मृत्यूनंतर सारे नष्ट होते, पण अवयवरूपी जिवंत रहायचे असेल, तर अवयवदान सर्वात श्रेष्ठ पर्याय आहे. मृत्यूपश्चात एक देह सात जणांच्या आयुष्यात आशेचा किरण ठरू शकतो, तर ३५ लोकांच्या आयुष्याचा दर्जा सुधारू शकतो, मात्र अवयवदानाविषयी फारशी जागृती नसल्याने कित्येक रुग्ण वर्षानुवर्ष प्रतीक्षेत आहेत. अवयवदान हे केवळ डोळे किंवा किडनीपुरता मर्यादित नसून शरीराचे सुमारे १० विविध अवयव हे दान करता येतात, पण त्याकरिता पुरेशी माहिती व इच्छाशक्ती नसते. त्यामुळे मरणोत्तर अवयवदानाचा संकल्प करण्यास फारसे कोणी पुढे येत नाहीत, परंतु पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर व त्यांच्या पत्नी वर्षा ठाकूर यांनी महत्त्वाचे पाऊल उचलत समाजापुढे आदर्श ठेवला आहे. (पान २ वर..)



> आपल्या मातृभूमीच्या रक्षणासाठी सीमेवर तैनात जवान स्वतःच्या प्राणांचे बलिदान देऊन हुतात्मा होतात. आज आरोग्य विज्ञानातील संशोधनामुळे एखादा सामान्य नागरिकही जीवनदानासारखे सर्वोच्च दान देऊन मृत्यूनंतरही आपल्या अवयवांच्या रूपाने अमर होतो. मानवता हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे हे सिद्ध करणारी कृती म्हणजे अवयवदान. आज मी व पत्नी वर्षा हिने भारत सरकारच्या pledge.mygov.in/organ-donation या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन अवयवदानाची शपथ घेतली. मृत्यूनंतरदेखील आपण इतरांच्या कामी येऊ शकतो, आपल्या एका कृतीमुळे दुसऱ्या व्यक्तीचे जीवन सुखकर करीत त्याला नवीन जीवनदान देऊ शकतो ही भावना अतिशय सुखदायी आहे. आपण सर्वही या कृतीसाठी पुढे या, अवयवदानाची शपथ घ्या आणि इतरांनाही याबाबत माहिती द्या.
>
> **–प्रशांत ठाकूर**, आमदार

# पनवेलमध्ये शेकापला आणखी एक हादरा

## उसर्ली सरपंच अनिता भगत यांच्यासह सदस्य, माजी सरपंच, उपसरपंच भाजपमध्ये



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाला पुन्हा एकदा हादरा बसला असून उसर्ली ग्रामपंचायतीमधील शेकापच्या सरपंच अनिता भगत यांच्यासह ग्रामपंचायतीचे सदस्य, माजी सरपंच, माजी उपसरपंचांनी भारतीय जनता पक्षाचे विकासाचे कमळ हाती घेतले आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्व प्रवेशकर्त्यांचे पक्षाची शाल देऊन स्वागत केले. विचुंबे येथे झालेल्या या कार्यक्रमास भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत आदी उपस्थित होते. (सविस्तर वृत्त पान ३ वर..)

## काँग्रेसने विश्वासात न घेतल्याने घटक पक्ष नाराज

**मुंबई : प्रतिनिधी**

पाच राज्यांच्या विधानसभा निवडणूक निकालानंतर काँग्रेसविरोधात घटक पक्षांची नाराजी समोर आली आहे.

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री व तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्ष ममता बॅनर्जी यांनी इंडिया आघाडीतील पक्षांशी जागावाटपाबाबत काँग्रेसने चर्चा केली नाही, असा आरोप केला. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनीही काँग्रेस विश्वासात घेत नाही, असे म्हटले आहे.

## निवडक

### मिचाँग चक्रीवादळाचा चेन्नईला तडाखा; जनजीवन विस्कळीत

**चेन्नई** : मिचाँग चक्रीवादळाचा चेन्नईला मोठा फटका बसला आहे. चेन्नईत मुसळधार पाऊस पडून जनजीवन विस्कळीत झाले आहे. पावसासह सोसाट्याच्या वाऱ्यामुळे शहरातील अनेक भागात वीजसेवा ठप्प झाली आहे. खराब हवामानामुळे अनेक गाड्या आणि उड्डाणे रद्द करण्यात आल्याने वाहतूक सेवेवर परिणाम झाला आहे.

### मिझोराममध्ये झेडपीएम पक्षाने मिळवली सत्ता

**आयझॉल** : विविध एक्झिट पोल्समध्ये वर्तवण्यात आलेल्या अंदाजाप्रमाणेच मिझोराम विधानसभा निवडणुकीत झोरम पीपल्स मूव्हमेंट (झेडपीएम) पक्षाने राज्यात सत्ता मिळवली आहे. लालदुहोमा यांच्या नेतृत्त्वाखाली झेडपीएमने २७ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवले आहे. सत्ताधारी मिझो नॅशनल फ्रंट (एमएनएफ) पक्षाला केवळ १० जागांवर समाधान मानावे लागले आहे. भाजपला दोन ठिकाणी विजय प्राप्त झाला आहे, तर सर्व ४० जागा लढवलेल्या काँग्रेसला अवघ्या एका ठिकाणी यश मिळाले आहे.

# पाली नगरपंचायतीवर भाजपचा मोर्चा

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

विकासकामांसाठी आलेल्या निधीचा विनियोग न होणे, त्रयस्थ व्यक्तीचा कामकाजात हस्तक्षेप, पर्यावरण, स्वच्छता व यात्राकर वसुली अशा अनेक कारणांमुळे भाजपतर्फे पाली नगरपंचायत कार्यालयावर सोमवारी (दि.४) मोर्चा काढण्यात आला होता. या वेळी पालिकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विद्या येरूनकर यांना घेराव घालण्यात आला.

भाजप सुधागड तालुका अध्यक्ष श्रीकांत ठोंबरे यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थांनी हा मोर्चा काढला होता. या वेळी मागण्यांचे निवेदन मुख्याधिकाऱ्यांना देण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, भारतीय जनता पक्षाच्या पुढाकाराने पाली गावच्या विकासासाठी कोट्यवधींचा इतका निधी मार्च महिन्यात उपलब्ध करून देण्यात आला आहे, पण त्या कामांच्या वर्कऑर्डर अद्याप देण्यात आल्या नाहीत. हे मुद्दाम केले जात आहे. त्याचप्रमाणे आदिवासी विभागाकडून आपल्या कार्यालयाला मागील चार महिन्यांपूर्वी ठक्कर बाप्पा योजनेचा प्रस्ताव सादर करण्यासंदर्भात सांगण्यात आले होते. आजपर्यंत तो प्रस्ताव पाठवण्यात आला नाही? या संदर्भात मुख्याधिकारी यांच्यासोबत चर्चा केल्यानंतर कार्यालयीन कामात त्रयस्थ व्यक्तीकडून हस्तक्षेप केला जात असल्याचे निदर्शनात येत आहे. हे कुठे तरी थांबले पाहिजे.

चारपाच दिवसांपूर्वी आम्ही तुमची भेट घेतली होती. तेव्हा तुम्ही या करवसुलीवरून आम्हाला असे सांगितले की, हो वसुली गणपतीत बंद करायला सांगितली होती, पण ती अजून चालू कशी? याला कोण पाठिंबा देतोय हे शोधायला लागेल आणि त्या ठेकेदारावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा. (पान २ वर..)

### मुख्याधिकाऱ्यांना घेराव



# पनवेल मनपा क्षेत्रातील २९ गावांना पाणीपुरवठा व्यवस्थेसाठी निधी मंजूर

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठपुराव्याला यश



(अधिक छायाचित्रे पान ३ वर..)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रातील २९ गावांसाठी भाजपचे मावळ लोकसभा मतदारसंघ प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठपुराव्यामुळे केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत सुमारे १२३ कोटी रुपयांचा निधी पाणीपुरवठ्याची व्यवस्था करण्यासाठी मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार २९ गावांमध्ये जलवाहिन्या टाकणे तसेच पाण्याच्या टाक्या उभारण्याची कामे करण्यात येणार आहेत. या कामांचे भूमिपूजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत प्रभाग क्रमांक २मधील तोंडरे गावात भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि पडघे येथे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते सोमवारी (दि.४) झाले.

### तोंडरे, पडघे येथे विविध कामांचे भूमिपूजन

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी शेकाप पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून या विकासकामांचे श्रेय घेण्याच्या वृत्तीचा समाचार घेत शेकापचे या विकासकामांमध्ये एका रुपयाचेही योगदान नाही, असे सांगून भाजप नियोजनबद्ध पद्धतीने सर्व गावांचा विकास डोळ्यांसमोर ठेवून काम करीत आहे. पनवेल महापालिकेत समाविष्ट झालेल्या सर्व गावांना अभिमान वाटेल अशा पद्धतीचे काम करण्यासाठी भाजप महापालिकेला सातत्याने प्रवृत्त करीत राहील, अशी ग्वाही दिली.

पनवेल महापालिका क्षेत्रात केंद्र शासनाच्या अमृत २.० अभियान अंतर्गत पाणीपुरवठ्याची व्यवस्था करण्यासाठी निधी मंजूर झाला आहे. याद्वारे पनवेल महापालिका क्षेत्रातील २९ गावांमध्ये पाणीपुरवठा व्यवस्था पुरवणे, जलवाहिन्या, पाण्याच्या टाक्या, मलनिस्सारण वाहिन्या उभारण्याचे काम १२३ कोटी १४ लाख ३१ हजार ६६९ रुपयांच्या निधीमधून करण्यात येणार आहे. (पान २ वर..)

# वक्तृत्व स्पर्धेत ‘सीकेटी’ची निधी मेहत्तर प्रथम

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारमंच पुरस्कृत सधम्म सामाजिक संस्था आणि विवेक विचार मंच पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिननिमित्त वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यम विद्यालयातील निधी संदीप मेहत्तर हिने प्रथम क्रमांक पटकाविला. या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी निधीचे अभिनंदन केले.

इयत्ता दहावीत शिकणाऱ्या निधी मेहत्तरने परखड आणि स्पष्ट शब्दांत विचार व्यक्त केले. आपले संविधान या विषयानुरूप तिने पाच मिनिटांचा व्हिडीओ आयोजकांना पाठविला होता. या स्पर्धेत २००हून जास्त स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. यामध्ये निधीने बाजी मारत ती प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली. तिला आठ हजार रुपयांचे बक्षीस मिळाले.


संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ.एस.टी. गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षक, मार्गदर्शक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी निधीचे या यशाबद्दल अभिनंदन केले.

निधीने मिळविलेले यश शाळेतील इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल अशी अपेक्षा व्यक्त करून मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी तिच्यासह मार्गदर्शक शिक्षिका पूर्वा खेडेकर व इतर सहकारी शिक्षकांचे कौतुक केले तसेच निधीला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# माणगावमध्ये सर्पदंश झालेल्या महिलेचा रुग्णालयात मृत्यू

## नातेवाईकांचा संताप, पोलिसांत तक्रार

**माणगाव : प्रतिनिधी**



माणगाव तालुक्यातील मांजरवणे येथील २४ वर्षीय विवाहित महिलेचा सर्पदंशाने उपचारादरम्यान माणगाव उपजिल्हा रुग्णालयात मृत्यू झाल्याची घटना सोमवारी (दि.४) घडली. या घटनेतील महिलेचा मृत्यू हा डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे झाला असल्याचा आरोप तिच्या नातेवाईकांनी केला असून तशी तक्रार मयत महिलेच्या दिराने माणगाव पोलीस ठाण्यात दिली आहे.

या घटनेने खळबळ उडून महिलेच्या नातेवाईकांनी व जमावाने माणगाव उपजिल्हा रुग्णालय येथे जमून कारभाराबाबत संताप व्यक्त केला. वेळीच माणगाव व गोरेगाव पोलीस उपजिल्हा रुग्णालय येथे दाखल होऊन त्यांनी परिस्थिती आटोक्यात आणली. पोलिसांनी नातेवाईकांची समज काढून त्यांना कायदेशीर मार्गाने जाण्याचा सल्ला दिला आहे.

या घटनेबाबत अधिक माहिती अशी की, मांजरवणे गावातील विवाहिता दनिया हाशिम हर्णेकर (वय २४) या महिलेला सोमवारी सकाळी ८ वाजता विषारी सर्पाने पायाला दंश केला. तिला लगेचच घरच्या मंडळींनी माणगाव उपजिल्हा रुग्णालयात ८.३० वा. दाखल केले. (पान २ वर..)

# भाजपच्या विजयाचा उरणमध्येही जल्लोष



**उरण : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाने चारपैकी तीन राज्यांमध्ये एकहाती सत्ता मिळवली आहे. या विजयानंतर उरणमध्ये आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत फटाक्यांची आतजबाजी करून, वाद्यांच्या गजरात नाचून आणि पेढे वाटून जल्लोष करण्यात आला.

लोकसभेची सेमिफायनल म्हणून मानल्या जाणाऱ्या विधानसभा निवडणुकांतील पाचपैकी चार राज्यांचे निकाल रविवारी जाहीर झाले. यामध्ये भारतीय जनता पक्षाने मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड या तीन राज्यांत एकहाती सत्ता मिळविली. या विजयामुळे देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा करिष्मा कायम असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

### आमदार महेश बालदी यांची उपस्थिती

विजयानंतर उरणमध्ये आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत आनंदोत्सव साजरा करण्यात आला. या वेळी भाजपचे तालुका अध्यक्ष रवी भोईर, शहर अध्यक्ष कौशिक शाह, निर्गुण कवळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी पंतप्रधान मोदींच्या नावाचा जयजयकार केला.


# पराभवाचा राग संसदेत काढू नका

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विरोधकांवर निशाणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला सोमवार (दि. ४)पासून सुरुवात झाली. त्या आधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांवर निशाणा साधला. पराभवाचा राग संसदेत काढू नका, अशा शब्दांत पंतप्रधान मोदींनी विरोधकांवर टीकास्त्र डागले आहे. चार राज्यांच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालाबाबत बोलताना त्यांनी देशातील जनतेने नकारात्मकतेचा पराभव केला आहे, असे म्हटले आहे.

विधानसभा निवडणुकीतील चार प्रमुख राज्यांमध्ये भाजपने तीन राज्यांत दमदार विजय मिळवला आहे, तर काँग्रेसला एका ठिकाणी सरकार स्थापन करता येणार आहे. या पार्श्वभूमीवर विरोधकांच्या पराभवावर निशाणा साधताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, निवडणुकीत ज्यांच्या पराभव झाला आहे त्यांनी संसदेत त्यांचा राग दाखवू नका. पंतप्रधानांनी पुढे म्हटले की,



लोकशाहीमध्ये सत्ताधारी पक्ष आणि विपक्ष समान आहे. राजकारणात जनतेचे हित विसरू नका. हा निवडणुकीचा निकाल सकारात्मक पद्धतीने जनतेसमोर आणा, असे आवाहन पंतप्रधानांनी राजकीय विश्लेषकांना केले आहे.

विधानसभा निवडणुकीत भाजपला मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थानमध्ये दमदार विजय मिळाला आहे, तर काँग्रेसला फक्त तेलंगणामध्ये विजय मिळाला. तीन राज्यांतील विजयानंतर पंतप्रधान मोदी यांनी म्हटले की, काही लोक याला सरकार समर्थक सुशासन किंवा पारदर्शकता म्हणतात हे देशात दिसून येत आहे. देशाने नकारात्मकता नाकारली आहे. लोकांच्या आकांक्षा बळकट करण्यासाठी लोकशाहीचे मंदिर महत्त्वाचे व्यासपीठ आहे. मी सर्व सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी तयार राहून संसदेत मांडलेल्या विधेयकांवर सखोल चर्चा करावी.

पंतप्रधान मोदी यांनी विरोधकांवर निशाणा साधताना म्हटले की, शिवीगाळ, निराशा आणि नकारात्मकता घमंडिया आघाडीसाठी हेडलाईन्स बनू शकतात, पण जनतेच्या मनात स्थान देऊ शकत नाही. त्यांनी विरोधाकांना इशारा देत म्हटले आहे की, सुधरा, नाहीतर जनताच तुम्हाला साफ करेल. हा निकाल काँग्रेस आणि त्यांच्या आघाडीसाठी मोठा धडा आहे. काही लोक एकत्र एका मंचावर आल्याने फक्त चांगला फोटो येऊ शकतो, पण देशाचा विश्वास जिंकू शकत नाही. देशातील जनतेचे मन जिंकण्यासाठी राष्ट्रसेवा करणे गरजेचे आहे.

**सकारात्मक विचार घेऊन या**

पंतप्रधान मोदी यांनी म्हटले की, चार राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल उत्साह दाखवणारे आणि देशाचे भविष्य निश्चित करणारे आहेत. चांगल्या जनादेशानंतर आम्ही संसदेच्या मंदिरात भेटत आहोत. मी सर्व खासदारांना सकारात्मक विचार घेऊन संसदेत यावे, असे आवाहन करतो. बाहेरच्या पराभवाचा राग संसदेत आणू नका. लोकशाहीच्या मंदिराला स्टेज बनवू नका. देशाला सकारात्मकतेचा संदेश द्या.

# मुंबईतील ३०० शाळा, महाविद्यालयांत करिअर मार्गदर्शन

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महानगर क्षेत्रातील ३०० शाळा, महाविद्यालयांमधील ६० हजार विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना करिअर मार्गदर्शनपर मेळावा पहिल्या टप्प्यामध्ये आयोजित केला जाणार आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग, शालेय शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, शिक्षण संचालनालय आणि मुंबई महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमाचा शुभारंभ कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते मंगळवारी (दि.५) सकाळी १० वाजता सह्याद्री अतिथीगृह येथे होणार आहे.

शालेय शिक्षण घेत असताना करिअरच्या वेगवेगळ्या संधी कोणत्या आहेत याबाबत विद्यार्थी आणि पालकांना माहिती व्हावी यासाठी शासनाचे वेगवेगळे विभाग एकत्र येत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबईतील महानगरपालिका क्षेत्रातील खासगी अनुदानित, विनाअनुदानित शाळा तसेच महाविद्यालयांमध्ये करिअर मार्गदर्शन मेळावा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

करिअर मार्गदर्शन कार्यक्रमांमध्ये करिअर कसे निवडावे, करिअरच्या विविध वाटा, व्यक्तिमत्त्व विकास, कृत्रिम बुद्धीमत्तेच्या सहाय्याने अभ्यास कसा करावा याबाबत विद्यार्थी व पालकांना तज्ज्ञांद्वारे मार्गदर्शन केले जाईल. या वेळी विविध अभ्यासक्रमांची माहिती असलेली करिअर प्रदर्शनी विद्यार्थी आणि पालकांना पाहण्यास उपलब्ध असेल. त्यामुळे हा मेळावा सर्वार्थाने विद्यार्थी व पालकांसाठी उपयुक्त ठरणार आहे. विविध करिअर क्षेत्र, विविध अभ्यासक्रम, प्रवेश परीक्षा, प्रवेश प्रक्रिया, स्पर्धा परीक्षा, शिष्यवृत्ती योजना याबाबत अद्यायावत माहिती असलेले करिअर प्लॅनर हे पुस्तक विद्यार्थी व पालकांना विनामूल्य देण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले आहे.

या कार्यक्रमामध्ये करिअर मार्गदर्शक आनंद मापुस्कर, प्रादेशिक विद्या प्राधिकरणच्या प्राचार्य मनिषा पवार यांचे पथक करिअर मार्गदर्शन करणार आहे. ३०० शाळा, महाविद्यालयांमधील ६० हजार विद्यार्थ्यांसाठी मेळावा होणार आहे.

# लोणावळा येथे कोळी समाजाचे दोन दिवसीय संमेलन उत्साहात

**मुरूड, नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

कोळी महासंघाच्या नावाने संपूर्ण कोळी समाज एकवटला पाहिजे. कोळी महासंघ राज्यातील सर्व कोळी समाज घटकांना एकत्र करून राजकीय अस्तित्व निर्माण करण्यासाठी सज्ज होत असल्याचे कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष व भाजप आमदार रमेश पाटील यांनी प्रतिपादन केले.



लोणावळा येथे कोळी समाजाचे राज्यासह तालुका पातळीवरील पदाधिकाऱ्यांना आणि पाच विभागातील संपर्कप्रमुख आणि लोकसभा, विधानसभा अध्यक्षांच्या नियुक्ती आणि कार्याचा आढावा घेण्यासाठी दोन दिवसांचे संमेलन आयोजित केले होते. त्या वेळी आमदार रमेश पाटील बोलत होते.

विधानसभा आणि लोकसभानिहाय पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करून कार्यकारिणीच्या कार्याचा आढावा या वेळी घेण्यात आला. खानदेश, मराठवाडा, विदर्भ, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र या विभागामध्ये संपर्कप्रमुख आणि त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा, समाजाभिमुख संपर्क यावर भर देण्यात आला. या वेळी कोळी महासंघाचे कार्याध्यक्ष प्रकाश बोबडी, सरचिटणीस राजहंस टपके, उपनेते देवानंद भोईर, युवा प्रदेशाध्यक्ष ॲड. चेतन पाटील, अरुण लोणारे, प्रा. सुरेश पाटकर, शिवशंकर फुले, सतीश धडे, प्रा. अभय पाटील, रामभाऊ कोळी, रामदास कोळी आदींसह समाजबांधव उपस्थित होते.

## अपघातग्रस्त मयूर तांबडेचा मृत्यू

**श्रीवर्धन : बातमीदार, प्रतिनिधी**

श्रीवर्धन-जसवली मार्गावरील पतंगे रिसॉर्टसमोर ६ नोव्हेंबर रोजी दुचाकी व टेम्पोचा अपघात घडला होता. या अपघातातील जखमी मयूर तांबडे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

अपघातानंतर मयूर तांबडे याला उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धन येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. गंभीर जखमी असल्याने त्यांना पनवेल येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचाराला प्रतिसाद न दिल्याने त्याचा मृत्यू झाला. मयूर यांच्या मृत्यूने रानवली गावावर शोककळा पसरली आहे.

# विदर्भावर अवकाळी पावसाचे सावट कायम

## पुन्हा एकदा पावसाचा इशारा

**नागपूर : प्रतिनिधी**

हवामान विभागाच्या माहितीनुसार पुढील २४ तासांमध्ये विदर्भाला पुन्हा एकदा अवकाळीचा तडाखा बसू शकतो, तर उत्तर महाराष्ट्रावर काळ्या ढगांचे सावट असणार आहे. मुख्यत्वे राज्यातील तापमानात यामुळे कमालीची अस्थिरता पाहता येणार आहे.

महाराष्ट्रातून मान्सूनने माघार घेऊन आता हिवाळ्याचेही काही महिने सरलेले असताना हा पाऊस काही पाठ सोडताना दिसत नाही आहे. मोसमी पावसाचे वारे परतले असले तरीही मागील काही महिन्यांपासून अरबी समुद्रासह बंगालच्या उपसागरामध्ये तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे महाराष्ट्रात अवकाळी पावसाचे सत्र सुरू झाले. त्यातच आता बंगालच्या उपसागरामध्ये मिचौंग चक्रीवादळाची निर्मिती झाल्याने परिणामस्वरूप महाराष्ट्रातील तापमानात अनेक चढउतार होताना दिसत आहेत.

आता कुठे राज्याच्या काही भागांमध्ये हिवाळा जम धरताना दिसत होता, पण पावसाची ये-जा सुरूच असल्यामुळे तापमानावर याचे थेट परिणाम होताना दिसत आहेत. तिथे महाबळेश्वरमध्येही तापमानात काहीशी वाढ झाली असून ते १५ ते १६ अंशांच्या घरात पोहचले आहे. दरम्यान, सध्या या साऱ्यामध्ये राज्याच्या बहुतांश जिल्ह्यांवर दाट धुक्याची



चादर असल्यामुळे पहाटे आणि सकाळच्या वेळी दृश्यमानता कमी असल्याचे पहायला मिळत आहे.

हवामान विभागाने देशपातळीवर वर्तवलेल्या अंदाजामध्येही बरेच चढउतार पहायला मिळत आहेत. ज्यामध्ये तामिळनाडूचा दक्षिण पट्टा, आंध्र प्रदेशचा अंतर्गत भाग आणि ओडिशा, छत्तीसगडचा मोठा भाग पावसाने प्रभावित होऊ शकतो, तर उत्तरेकडील हिमाचल प्रदेश, जम्मू काश्मीर, लेड लडाख प्रांत आणि उत्तराखंडमध्ये थंडीचा कडाका वाढेल. श्रीनगरमध्ये पावसाची रिमझिम असल्यामुळे हवेत गारवा वाढणार आहे. या भागांमधील पर्वतीय क्षेत्रांवर शीतलहरी कायम राहतील.

# जिल्हा रुग्णालयात आठ वर्षीय बालिकेला नवजीवन

**रायगड** : जिल्हा शल्य चिकित्सक अंबादास देवमाने यांच्या दुर्दम्य इच्छाशक्तीसमोर यांच्यासमोर आजारानेदेखील हार मानली. एका आठ वर्षीय बालिकेला डॉ. देवमाने यांनी नवजीवन दिले आहे.

प्रविका विश्वास शिंदे (वय ८, रा. चिकलगाव, धोर्जे, म्हसळा) हिला १०-१५ दिवसांपासून पोटदुखीचा त्रास होता आणि आठवडाभरापासून ताप येत होता. तिला गेल्या रविवारी म्हसळा येथील एका खासगी डॉक्टरकडे नेण्यात आले होते, तेथे तपासणी केल्यानंतर डॉक्टरांनी सोनोग्राफीचा सल्ला देऊन उपचार केले. तिची लक्षणे कायम राहिल्याने पुन्हा तपासणी केली. डॉक्टरांनी नातेवाईकांना, तिची प्रकृती ठिक नाही. तिचे ऑपरेशन करावे लागेल, असे सांगितले. त्यानंतर तिला ३० नोव्हेंबर रोजी अलिबागच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.

जिल्हा शल्यचिकित्सकांनी तत्काळ पाहणी करून त्यांनी त्या मुलीवर शस्त्रक्रिया केली. सद्यस्थितीत या मुलीची प्रकृती आता बरी आहे. ही शस्त्रक्रिया यशस्वी करण्याकरिता डॉ. राजेशा के., डॉ. आनंद हेगडे, भूलतज्ज्ञ डॉ. सुश्मिता बी. व शस्त्रक्रिया गृहातील परिचारिका यांचे विशेष सहकार्य लाभले.

# पनवेलमध्ये दुकानदारांकडून मराठीत नामफलक

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेने प्रभाग अ, ब, क, ड या चारही प्रभागांमध्ये १६४१ दुकानांना नामफलक मराठी भाषेमध्ये लावण्यासाठी नोटीसा बजावल्या होत्या. महापालिकेने दिलेल्या या नोटीसांचा प्रभाव सर्वत्र दिसू लागला आहे. चारही प्रभागातील दुकाने व आस्थापनांचे नामफलक मराठीत लिहिलेले दिसून येत आहेत.




महाराष्ट्र दुकाने व आस्थापना सुधारणा अधिनियम २०२२मधील कलम ३६ 'क'नुसार सर्व दुकाने, संस्था, वाणिज्य आस्थापना, निवासी हॉटेल्स, उपहारगृहे व खाद्यगृहे किंवा सार्वजनिक मनोरंजनाची अथवा करमणुकीची इतर ठिकाणांचे नामफलक देवनागरी लिपीतील मराठी भाषेमध्ये असणे बंधनकारक आहे. त्यानुसार आयुक्त गणेश देशमुख यांच्या सूचनेनुसार पनवेल महानगरपालिका हद्दीतील चारही प्रभागांमधील मराठी नामफलक नसलेल्या १,६४१ दुकानांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत, तसेच प्रत्येक प्रभागात स्पीकरद्वारे अनाउन्समेंटदेखील केली जात आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील अनेक दुकाने व आस्थापनांवरील नामफलक फक्त इंग्रजीत व अन्य भाषेत आहेत. काही फलकांवर नावे मराठी भाषेत लिहिलेली जरी असली तरीही ती औपचारीकता म्हणून कोपऱ्यात लहान अक्षरात लिहिलेली आहेत.

नियमाप्रमाणे दुकाने किंवा आस्थापनांवरील नामफलक हे ठळक मराठी लिपीत असावा असे नमूद आहे. त्यानुसार आता मोठ्या प्रमाणात दुकानांवर मोठ्या अक्षरात मराठी भाषेतील नामफलक दिसून येत आहेत.

# पोलादपुरातील आड ते रान पारघाट रस्त्याचे भूमिपूजन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

गेल्या १४ वर्षांमध्ये महाड विधानसभा मतदारसंघातील अनेक वस्त्या आणि वाड्यांना रस्त्यांनी जोडताना मतदारांनाही शिवसेनेसोबत जोडले असल्याचे प्रतिपादन आमदार भरत गोगावले यांनी केले.

तालुक्यातील आड, निवे, ताम्हाणे, किनेश्वर, रान पारघाट असा ५.५ कोटी रुपये खर्चाचा ६.५ किमी रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून करण्याच्या कामाचा शुभारंभ आमदार गोगावले यांच्या उपस्थितीत रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी मॅनेजिंग डायरेक्टर रामचंद्र डांगे यांच्या हस्ते आड येथे करण्यात आला.

या वेळी राजिप माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, चांभारगणीचे सरपंच तानाजी पवार, माजी सरपंच शांताराम गोळे, कापडे खुर्दचे सरपंच संदीप काळे, दत्ताराम तळेकर, तानाजी निकम, राजेश डांगे, लक्ष्मण मोरे, ठेकेदार संजय चव्हाण आणि रामदास कळंबे यांच्यासह चांभारगणी बुद्रुक ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते. प्रारंभी माजी सरपंच तथा शिवसैनिक स्व. विठ्ठलमामा पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

राजिपचे माजी सदस्य चंद्रकांत कळंबे यांनी, आड, निवे, ताम्हाणे, किनेश्वर, रान पारघाट हा रस्ता पुढे कुडपण कोंडूशी रस्त्याला जोडण्यात येणार असल्याचे सांगितले. माजी सरपंच शांताराम गोळे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले.

पान १ वरुन

## आमदार प्रशांत ठाकूर, पत्नी वर्षा ठाकूर यांच्याकडून अवयवदानाचा स्तुत्य संकल्प

ठाकूर दाम्पत्याने भारत सरकारच्या pledge.mygov.in/organ-donation या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन अवयवदानाची शपथ घेतली. मृत्यूनंतरदेखील आपण इतरांच्या कामी येऊ शकतो. आपल्या एका कृतीमुळे दुसऱ्या व्यक्तीचे जीवन सुखकर करीत त्याला नवीन जीवनदान देऊ शकतो या भावनेतून ठाकूर दाम्पत्याने पुढाकार घेतला.

## पनवेल मनपा क्षेत्रातील २९ गावांना पाणीपुरवठा व्यवस्थेसाठी निधी मंजूर

यातील प्रभाग क्रमांक २मधील नावडे, पडघे, तोंडरे, देवीचापाडा, ढोंगऱ्याचापाडा, पाले खुर्द, नागझरी या गावांमधील कामांचे भूमिपूजन सोमवारी करण्यात आले.

या कार्यक्रमास पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, प्रभाग अध्यक्ष कृष्णाशेठ पाटील, युवा मोर्चा सरचिटणीस दिनेश खानावकर, सुरेश खानावकर, वासुदेव पाटील, तालुका उपाध्यक्ष सचिन पाटील, माजी सरपंच राम पाटील, अशोक पाटील, श्रीनाथ पाटील, रूपेश पाटील, ॲड.पवन भोईर, राजेश पाटील, अशोक साळुंखे, महेंद्र म्हात्रे, सतिश पाटील, महेंद्र म्हात्रे, गजानन पाटील, दिलीप भोईर, शंकूनाथ पडघेकर, पांडूशेठ भोईर, किरण दरे, नाथा माऊली, नामदेव भोईर, गुरूनाथ भोईर, पवन भोईर, माजी पंचायत समिती सदस्य कुंदा पाटील, अनिता म्हात्रे, सुवर्णा पाटील, सुश्मिता पाटील, विजय कांबळे, विद्यानंद पाटील, महेश भोईर, भरत म्हात्रे, विजय पाटील, किसन पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## पाली नगरपंचायतीवर भाजपचा मोर्चा

पर्यावरण व स्वच्छतेच्या नावावर होत असलेली भाविकांची व तालुक्यातील नागरिकांची लूट थांबावी, विकासकामे अडवू नयेत, ऑनलाईन निविदा प्रक्रियेतील भ्रष्टाचारावर कारवाई करावी, असेही निवेदनात म्हटले आहे.

या मोर्चात भाजपचे प्रदेश सदस्य व दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, अलाप मेहता, श्रीकांत ठोंबरे, सागर मोरे, सुशील थळे, आरिफ मनियार, सुशील शिंदे, प्रदीप गोळे, नरेश खाडे व रवी ठोंबरे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच बुरूमाळी, झाप, आगर आळी नवीन वसाहत, देऊळवाड, तळई, गोमारी, सोसायटीवाडी आणि पालीमधील विविध विभागातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विद्या येरूनकर यांनी मोर्चेकरांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने लेखी अहवाल दिला आहे. त्यामध्ये विकासकामांच्या वर्कऑर्डर येत्या १५ दिवसांत देण्यात येतील. आदिवासी विभागाकडे प्रस्ताव तयार असून लवकरच संबधित कार्यालयाकडे सादर करण्यात येईल. महिला नगरसेवक सदस्यांच्या पती हस्तक्षेपाबाबत महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन परिपत्र क्र.जीईएन १०९/१३४५/प्र.क./१०६/९३/नवी-मंत्रालय यांच्या परिपत्रकाप्रमाणे इथून पुढे दक्षता घेण्यात येईल तसेच संदर्भीय तक्रार जिल्हाधिकारी रायगड यांना कळविण्यात येईल. पर्यावरण व स्वच्छता करवसुलीबाबत संबंधितांना यापूर्वी बंद करण्यासाठी नोटीस देण्यात आलेली आहे. या ठेक्याबाबत जिल्हा प्रशासन अधिकारी यांच्याकडे पुढील कार्यवाहीकरिता सादर करण्यात येईल. ऑनलाईन निविदा प्रक्रियेसंदर्भात कार्यादेश देण्यात आले असून त्या संदर्भात जिल्हा प्रशासन अधिकारी यांच्याकडून मार्गदर्शन मागवून पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे नमूद करण्यात आले आहे.

## माणगावमध्ये सर्पदंश झालेल्या महिलेचा रुग्णालयात मृत्यू

या ठिकाणी तिच्यावर औषधोपचार सुरू असताना दुपारी ३ वाजून १२ मिनिटांनी तेथील डॉक्टरांनी ती महिला मयत झाल्याचे घोषित केले. त्यानंतर या महिलेचा पती, आई, वडील, दीर व अन्य नातेवाईक यांनी आक्रोश करीत उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांबद्दल संताप व्यक्त केला. पोलीस वेळीच दाखल झाल्याने पुढील बाका प्रसंग टळला. मयत महिलेचा मृतदेह सायंकाळी उशिरापर्यंत रुग्णवाहिकेत माणगावात होता. हा मृतदेह शवविच्छेदनासाठी मुंबईला नेण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी देऊन शवविच्छेदनानंतर या महिलेचा मृत्यू नेमका कशामुळे झाला हे समजेल असे सांगितले.

या घटनेबाबत प्रसारमाध्यमांशी बोलताना मयत महिलेचा दीर महेफुज हर्णेकर याने सांगितले की, उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे आमच्या वहिनीचा मृत्यू झाला आहे. सकाळी ८.३० वहिनीला येथे आणल्यावर कोणीच डॉक्टर नव्हते. त्यानंतर ९.१५ वाजता डॉक्टर येऊन त्यांनी उपचाराला सुरुवात केली. वहिनीची प्रकृती गंभीर झाल्याने येथील डॉक्टरांनी उशिरा दुपारी एमजीएम हॉस्पिटलला घेऊन जा असे सांगितल्यावर आम्ही त्वरित रुग्णवाहिकेतून पुढे जाण्याचा निर्णय घेतला. तोपर्यंत उपजिल्हा रुग्णालयातच वहिनीचा मृत्यू झाला होता. हा मृत्यू येथील डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे झाल्याने त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी.

यावर प्रभारी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गोमसाली यांनी सांगितले की, घटनेतील रुग्ण महिला सर्पदंश झाल्याने सकाळी ९.१५ वाजता रुग्णालयात दाखल झाल्यावर फिजिशियन डॉक्टरांनी तिच्यावर लगेचच औषधोपचार सुरू केले. आवश्यक ती सर्व औषधे वापरण्यात आली, पण तिच्याकडून तसा प्रतिसाद मिळाला नाही. तिच्यावर उपचार करीत असताना आम्ही वेळोवेळी तिच्या नातेवाईकांशी बोलून, तसे लिहून घेऊन त्यांची सहीदेखील घेतली आहे.

# आदर्श पतसंस्था राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित




**अलिबाग : प्रतिनिधी**

सहकारात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल अलिबाग येथील आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेला राष्ट्रीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सहकार भारतीतर्फे हा पुरस्कार दिल्लीत देण्यात आला.

सहकार भारतीच्या विद्यमाने पतसंस्थांच्या समस्या केंद्रीय स्तरावर मांडण्यासाठी दिल्ली येथे २ व ३ डिसेंबर रोजी राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनात राष्ट्रीय पुरस्कार देण्यात आलेल्या देशातील तीन पतसंस्थामध्ये अलिबाग येथील आदर्श नागरी पतसंस्थेची सामावेश आहे. आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थेचे संस्थापक सुरेश पाटील, संचालक अनंत म्हात्रे, सतीश प्रधान, जगदीश पाटील, विलाप सरतांडेल, रामभाऊ गोरीवले, भगवान वेटकोळी, संजय राऊत, मकरंद आठवले, सीओ अजय थळकर यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

# पनवेलमध्ये शेकापला आणखी एक हादरा

## उसर्ली सरपंचांसह सदस्य, माजी सरपंच, माजी उपसरपंचांचा भाजपमध्ये प्रवेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शेतकरी कामगार पक्षाला पुन्हा एकदा जोरदार हादरा बसला असून उसर्ली ग्रामपंचायतीमधील शेकापच्या सरपंच अनिता भगत यांच्यासह ग्रामपंचायतीचे सदस्य, माजी सरपंच, माजी उपसरपंचांनी भारतीय जनता पक्षाचे विकासाचे कमळ हाती घेतले आहे. विचुंबे येथे झालेल्या या पक्ष प्रवेशावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्व प्रवेश कर्त्यांचे पक्षाची शाल देऊन पक्षात स्वागत केले.

या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत उपस्थित होते. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सबका साथ सबका विकास हे सूत्र देशासह संपूर्ण समाजाचा विकास करत आहे. त्यामुळे तुमच्या येण्याने उसर्ली ग्रामपंचायतीमध्ये भारतीय जनता पक्षाला जनतेची सेवा करण्याची ताकद मिळाली असल्याचे प्रतिपादन केले.



पनवेल मतदार संघात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आणि भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून सर्व सामान्यांच्या हिताचे निर्णय घेत त्यांना विविध सुविधा उपलब्ध करुन देण्याचे काम होत आहे.

पक्षाच्या सक्षम नेतृत्वावर तसेच विकास कामांवर प्रभावीत होऊन उसर्ली ग्रामपंचायतीच्या सरपंच अनिता भगत, नितीन भगत, ग्रामपंचायत सदस्य मुकेश भगत, अर्चना भगत, अरुण वाघमारे, माजी सरपंच मिनाक्षी वाघमारे, जितेंद्र भगत, माजी उपसरपंच जितेंद्र भगत, माजी सदस्य जयंत भगत, निलेश भगत, मुकेश भगत, हेमंत भगत, हरेश भगत, संतोष भोईर, वसंत भोईर, नितेश भगत, मयुरेश भगत, रमेश भगत, राजू रोडे, रमेश कोलाटकर, अर्जून बच्चे, सतीष खिलारी, निलेश ठाकूर, सुरेश रेवाळे, उमेश देवरे, सागर शास्त्री, दत्ता कांबळे, नागेश महामुनकर, संभाजी शिंदे, काका कदम, दिनेश रेडकर, कृष्णा शेवाळे, उत्तम मनगुटकर, वैभव जाधव, अनिल देवळेकर, संधेश कुबल, रामनारयण गुप्ता, सुरेश गुप्ता, जयेश चित्रे, परशुमराम पाटील, युसुफ लदाप, मधुकर भगत, राजू रोडे, रमेश भगत, अरुण भोईर, सचीन काळे, गजेंद्र चिमणे, चांगदेव मराठे, गणेश गावडे, सुख शांती सोसायटीचे अध्यक्ष विनोद कोडावळे, उपाध्यक्ष निलेश ठाकूर, सुरेश वाघ, बबन पराडे, लक्ष्मण कांबळे, देविदास कांबळे, सुभाष जाधव, दिनेश देवरुखकर, हर्षल कांबळे यांनी भारतीय जनता पक्षामध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला.

विचुंब्यातील दिपसीटी इमारतीमध्ये झालेल्या या पक्ष प्रवेशावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, माजी उपसरपंच किशोर सुरते, राजेश पाटील, जयंत भगत, मच्छींद्र पाटील, विजय भगत, यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# भाजपच्या विजयाचा खारघरमध्ये जल्लोष



**खारघर : रामप्रहर वृत्त**

राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगडमध्ये विधानसभा निवडणुकीत भाजपला मोठे यश मिळाल्यानंतर खारघर भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष प्रवीण पाटील यांच्यासह माजी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पक्ष कार्यालयासमोर एकच जल्लोष केला.

या वेळी आपले मत व्यक्त करताना प्रवीण पाटील म्हणाले की, पाच राज्यांच्या निवडणुकांमध्ये कामगार, शेतमजूर, मातृ शक्तीने नरेंद्र मोदी यांच्यावर सर्वांत जास्त विश्वास ठेवला आहे. त्यामुळे तिन्ही राज्यात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वात यश मिळताना दिसत आहे. भारतीय जनता पक्षाचा विजय असो अश्या घोषणांनी फटाक्यांची आतषबाजी करत एकमेकांना पेढे वाटत महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार यांनी ये तो बस झाकी है, महाराष्ट्र अब बाकी है असा विश्वास व्यक्त केला तर युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील यांनी मतदारांनी नरेंद्र मोदी यांच्या विकासकामाला दिलेली ही पावतीच आहे, असे प्रतिपादन केले.

या वेळी खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, सरचिटणीस दीपक शिंदे, माजी नगरसेवक सरचिटणीस ॲड. नरेश ठाकूर, माजी नगरसेवक निलेश बाविस्कर, जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल, गुरुनाथ गायकर, समीर कदम, अमर उपाध्याय, डॉ. राकेश सोमाणी, रामकुमार चौधरी, शैलेंद्र त्रिपाठी, आनंदा मोकाशी, संजय मुळीक, अशोक जंगीड, जिल्हा युवा सचिव शुभ पाटील, तुकाराम कंटाळे, महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार, गीता चौधरी, मोना अडवाणी, निर्मला यादव, शोभा मिश्रा, कांचन बिर्ला, मीनाक्षी अंतवाल, नूतन सिंग, वनिता सोमण, सुशीला शर्मा, पुष्पा नायर, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, अक्षय लोखंडे, प्रवीण बेरा, आदित्य हातगे, आदेश पाटील, बंटी ढाकसे, दीपक ठाकूर, सुनील कटके, उमाकांत बुलबुले, रोशन राय, प्रदीप खळे, अमन सिंग, अनिकेत शर्मा आदी उपस्थित होते.

## निवडक

### भाजपच्या विजयाबद्दल जल्लोष



**पनवेल :** पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालात चारपैकी तीन राज्यांमध्ये भारतीय जनता पक्षाने बाजी मारली आहे. या विजयानंतर भाजपच्या विजयाबद्दल ठाणा नाका येथे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. या वेळी फटाक्यांची आतजबाजी करून, वाद्यांच्या गजरात नाचून व पेढे वाटून कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. भाजपने पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये विजय मिळवून काँग्रेसप्रणित इंडिया आघाडीला धोबीपछाड दिला आहे. या विजयानंतर पनवेल येथे भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त करून एकमेकांचे अभिनंदन केले. जल्लोष करतेवेळी भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम



**पनवेल :** शहरातील गावदेवी पाडा येथील श्री स्वामी समर्थ मंदिर (मठ) येथील मठाधिपती सुधाकर(भाऊ) घरत यांचा वाढदिवस स्वामी सेवकांनी सामाजिक बांधिलकीद्वारे साजरा केला. या वेळी तालुक्यातील नेरे पाडा येथील कातकरी वाडी येथे स्वामी सवेकांनी जाऊन तेथील बांधवांना व शालेय विध्यार्थ्यांना विविध वस्तूंचे वाटप केले तसेच स्वामी समर्थ दीपावली विशेषांक व श्रीफळ याचेसुद्धा वाटप केले.

# इच्छापूर्ती गणेश मंदिर परिसराची सफाई





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सूचनेनुसार तसेच जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील आणि शहर अध्यक्ष अनिल भगत यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेलमधील लोकमान्य नगर येथील इच्छापूर्ती गणेश मंदिर परिसर भाजप पदाधिकाऱ्यांच्या पाठपुराव्यातून स्वच्छ करण्यात आला आहे.

पनवेलमधील लोकमान्य नगर येथील इच्छापूर्ती गणेश मंदिराच्या परिसरात खूप प्रमाणात जंगली झाडे आणि गवत उगवल्याचा त्रास भाविकांना होत होता. ही बाब मंदिराचे अध्यक्ष जाधव यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निदर्शनास आणून दिली असता त्याची त्वरित दखल घेत सोमवारी (दि. ४) भाजप पदाधिकाऱ्यांनी मंदिर परिसर स्वच्छ करून दिला.

या वेळी भाजपचे शहर चिटणीस रूपेश नागवेकर, सोशल मीडिया शहर संयोजक प्रसाद हनुमंते, प्रभाग अध्यक्ष १८चे महेश सरदेसाई, विजय डिसोझा, महापालिका एसआय अनिकेत जाधव आणि कर्मचारी उपस्थित होते.

# खारघरमध्ये अश्वमेध महायज्ञासाठी कलश पूजन



**खारघर : रामप्रहर वृत्त**

अखिल विश्व गायत्री परिवाराच्या वतीने खारघर कॉर्पोरेट पार्क मैदानात २१ ते २५ फेब्रुवारी २०२४ दरम्यान अश्वमेध महायज्ञ करण्यात येणार आहे. या यज्ञासाठी गायत्री साधना करण्यात येणार असून रविवारी (दि. ३) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते दीप्रज्वलन करून कलश पूजन करण्यात आले.

या वेळी प्रशांत ठाकूर यांनी अखिल विश्व गायत्री परिवाराचे आभार व्यक्त करत नवी मुंबईतील रहिवासी भाग्यवान आहेत की त्यांच्या परिसरात एवढा मोठा आध्यात्मिक कार्यक्रम होत आहे. यासाठी सहकार्य करणार असल्याचे सांगून हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आपण सर्वांनी तन, मन, धनाने प्रयत्न करावेत, असे आवाहन केले.

या वेळी भाजपचे रायगड जिल्हा प्रज्ञा सेल सेलच्या अध्यक्षा गीता चौधरी, शोभा मिश्रा, शैलेंद्र त्रिपाठी आदी उपस्थित होते.

# पनवेल परिसरात दोन अपघात; एक ठार, दोन जखमी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात एक जण ठार तर दोघे जखमी झाल्याची घटना घडली आहे.

तालुक्यातील नेरे-पनवेल रोडवर कोप्रोली गावाच्या हद्दीत एमजीएन चिकन शॉप समोर केटीएम मोटरसायकली वरील चालकाने भरधाव वेगाने मोटरसायकल चालविल्याने दोन वृद्ध व्यक्तीस धडक बसली. झालेल्या अपघातात गोदावरी दुबे (वय ८४) यांचा जखमी होऊन मृत्यू झाला आहे तर सतीश दुबे (वय २३) हे जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

दुसऱ्या अपघातात मुंबई-पुणे महामार्गावर मुंबई वाहिनीवर शिवकर गावाजवळ बंद पडलेल्या ट्रकला टेम्पोने धडक दिल्याने झालेल्या अपघातात एक जण जखमी झाल्याची घटना घडली आहे. हा ट्रक मुंबईकडे जात असताना वाटेत बंद पडला होता. दरम्यान, पाठीमागून येणारा टेम्पोचालक लक्ष्मण शिंदे (वय ४०) यांचा वाहनावरील ताबा सुटल्याने टेम्पो ट्रकवर जाऊन धडकला. या अपघातामध्ये लक्ष्मण शिंदे यांच्या दोन्ही पायांना व डोक्याला दुखापत झाली. त्यांना आयआरबीच्या रुग्णवाहिकेतून कामोठे एमजीएम हॉस्पिटल येथे उपचाराकरिता नेण्यात आले आहे.

# ट्रेडिंगच्या नावाखाली दीड लाखांची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक केल्यास जास्त परताव्याचे आमिष दाखवून एक लाख ४२ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी दोघांविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रुचित राजेशकुमार गझीवाला यांना दोन तासांसाठी पाच हजार रुपये ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक केली तर २० हजार रुपये भेटतील, असा संदेश पाठवून गुंतवणूक करण्यास सांगितले. त्यावर गझीवाला यांनी त्वरित पाच हजार रुपये ट्रान्सफर केले. त्यानंतर गुंतवणूक केलेल्या रकमेचा २० हजारांचा परतावा घेण्यासाठी खाते खोला, असे त्यांना सांगण्यात आले. पुढे त्यांना कमिशन पे, जीएसटी, एक्स्पर्ट क्लिअरन्स व पेंडिंग चार्ज अशी वेगवेगळी कारणे सांगून टप्प्याटप्प्याने यांच्याकडून एक लाख ४२ हजार २१४ रुपये वेगवेगळ्या खात्यांवर ट्रान्स्फर करण्यास भाग पाडले, मात्र त्यांना परतावा दिला नाही. या प्रकरणात आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच गझीवाला यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

# जॉब देतो सांगून खारघरमधील महिलेची फसवणूक; गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

वर्क फ्रॉम होम जॉब असल्याचे सांगून गुगल रिव्ह्यू टास्क आणि डेटा टास्क पूर्ण केल्यानंतर पैसे देण्याचे आमिष दाखवून सहा लाख नऊ हजार ५०० रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ज्योती शर्मा या जलवायू विहार, सेक्टर २०, खारघर येथे राहतात. त्यांना व्हॉट्सॲपवर अनोळखी नंबरवरून वर्क फ्रॉम होम जॉबचा मेसेज आला व तीन गुगल रिव्ह्यू टास्क केल्यास दोनशे रुपये मिळतील, असा संदेश पाठवला. त्यानंतर शालिनी रावत हिने टेलिग्राम आयडीवरून टास्क करण्याकरता पेटीएम नंबर शेअर करण्यास सांगितले. सुरुवातीला तीन गुगल रिव्ह्यू केल्यानंतर २०० रुपये पेटीएमद्वारे दिले. पाच गुगल रिव्ह्यू केल्यानंतर त्यांनी शंभर रुपयांचा डेटाचा टास्क दिला. या वेळी १५०० रुपये दिले जाणार होते. डेटाचा टास्क पूर्ण केल्यानंतर १५०० रुपये पाठवण्यात आले. पुढे त्यांना तीन हजार रुपये पाठवल्यानंतर टास्क पूर्ण केल्यावर चार हजार ३०० रुपये देण्यात आले. त्यानंतर शालिनी रावत यांनी अभिषेक या इसमाशी टेलिग्रामवर जोडण्यासाठी लिंक पाठवली. त्याच्याशी जोडल्या गेल्यावर पाठवलेली लिंक क्लिक करण्यासाठी त्यांनी तीन वेगवेगळ्या स्टेप पाठवल्या.

या वेळी त्यांच्याकडून चूक झाली म्हणून डेटा रिपेरिंगसाठी एक लाख २६ हजार ५०० रुपये मागितले. त्यांनी ते पैसे पाठवले. भरलेले पैसे परत करण्यासाठी आणखी एक लिंक पाठवली व पुन्हा पैसे मागण्यात आले.

# सीकेटी विद्यालयात भव्य आनंद मेळावा





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालयातील छोटाशिशु, मोठाशिशु व इयत्ता पहिलीच्या विद्यार्थांनी या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

सोमवारी (दि. ४) विद्यालयात 'भव्य आनंद मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले होते, या कार्यक्रमाचे उद्‌घाटन माजी जि. प. सदस्य अमित जाधव, पाली-देवद-सुकापूर ग्रामपंचायतीच्या सदस्य प्राची जाधव यांच्या हस्ते झाले. या मेळाव्यासाठी उपस्थिल पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, उच्चमाध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, इंग्रजी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, इंग्रजी पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी तसेच पालक प्रतिनिधी, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

या मेळाव्यात विद्यार्थांनी घरगुती खाद्यपदार्थ, विविध वस्तू, फळे, भाज्या व स्टेशनरी वस्तू यांचे स्टॉल लावण्यात आले. या मागे विद्यार्थ्यांचे व्यवहार ज्ञान वाढावे व त्याचा प्रत्यक्ष अनुभव त्यांना घेता यावा यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. उपस्थितांनी मनमुरादपणे खरेदीचा व खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला. अशा प्रकारे हा आनंद मेळावा उत्साहात झाला.







**पनवेल : महापालिका क्षेत्रातील २९ गावांमध्ये जलवाहिन्या टाकणे तसेच पाण्याच्या टाक्या उभारण्याची कामे करण्यात येणार आहेत. त्यानुसार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत तोंडरे गावात भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि पडघे येथे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते या कामांचे सोमवारी भूमिपूजन झाले.**

## संपादकीय


# नकारात्मकतेकडे निर्देश

देशातील राजकारणाचा पोत अलीकडच्या काळात पूर्णत: नकारात्मक बनल्याचे सारेच जाणून आहेत. विरोधासाठी विरोध आणि टोकाचा मोदीद्वेष यावरच लक्ष केंद्रित करून असलेले विरोधीपक्ष दुसरे काहीही करत नाहीत. विरोधकांची एकजूटही तकलादू आहे याचेच दर्शन अधिक घडते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेमकेपणाने या नकारात्मकतेकडे आता निर्देश केला असून 'निवडणुकीतील पराभवाचा राग संसदेत काढू नका' असा टोलाही त्यांनी विरोधकांना लगावला आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जादू हिंदीभाषक पट्ट्यात जराही कमी झालेली नाही, हे मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगडमधील भारतीय जनता पक्षाच्या नेत्रदीपक यशातून पुरते दिसले आहे. विधानसभा निवडणुका पार पडलेल्या पाचपैकी तीन राज्यांमध्ये भाजपने निर्विवाद सत्ता मिळवली आहे. एका राज्यात सत्ता कायम राखण्यात तर दोन राज्यांमध्ये काँग्रेसच्या हातातून सत्ता हिसकावून घेण्यात भाजपला यश मिळाले आहे. या विधानसभा निवडणुका म्हणजे येत्या वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकांसाठीची 'लिटमस टेस्ट' मानल्या जात होत्या. या निवडणुकांचा कौल सुस्पष्टपणे भाजपच्या बाजूने आल्यामुळे लोकसभा निवडणुकांची तयारी आता भाजपकरिता सोपी झाली आहे. काँग्रेस आणि 'इंडिया आघाडी'तले अन्य विरोधीपक्ष यातून काही धडा घेणार का, हा आता मोठा प्रश्न आहे. या साऱ्या पार्श्वभूमीवर निवडणूक निकालांच्या दुसऱ्याच दिवशी सकाळी संसदेच्या प्रांगणात पत्रकारांशी बोलताना मोदीजींनी 'आता तरी सुधरा, अजून वेळ गेलेली नाही' असा मोफत सल्ला विरोधकांना दिला आहे. लोकांनी या निवडणुकांमध्ये नकारात्मकतेला नाकारले आहे. हेच या निवडणुकांचे निकाल सांगत आहेत. हाच मुद्दा पंतप्रधान मोदी यांनी रविवारपासून पुन्हा पुन्हा अधोरेखित केला आहे. थोडा आपला मार्ग बदलून पहा, विरोधासाठी विरोध करू नका. ज्या त्रुटी आहेत त्यावर चर्चा करा. हे अधिवेशन म्हणजे तुमच्यासाठी संधी आहे. आता तरी ही संधी घ्या आणि देशाला सकारात्मकतेचा संदेश द्या, असा अत्यंत प्रगल्भ राजकीय सूर मोदींनी लावला असून विरोधकांनी निश्चितच त्यांचा सल्ला गांभीर्याने घेण्याची गरज आहे. संसदेचे अधिवेशन सोमवारपासून सुरू झाले. सोमवारी नव्या संसदेच्या बाहेर प्रसारमाध्यमांशी पंतप्रधानांनी संवाद साधला, त्यावेळी त्यांनी विरोधकांचे हे असे कान टोचले. कर्नाटकमधील विधानसभा निवडणुकीनंतर काँग्रेस पक्षाचा आत्मविश्वास काहिसा बळावला होता. देशातील राजकीय वातावरण बदलू लागले आहे, जणु काही लोकांना आता बदल हवासा वाटतो आहे असा सूर काँग्रेस आणि इंडिया आघाडीतील अन्य पक्ष लावत होते, पण पाच राज्यांच्या निवडणुकांच्या निकालात तसे काहीही दिसलेले नाही. त्यामुळे विरोधकांना आता लोकसभा निवडणुकांची तयारी करताना आपल्या प्रचाराची दिशा निश्चितपणे बदलावी लागणार आहे. अर्थात, या निवडणुकांमध्ये विरोधकांच्या हाती अगदीच काही लागले नाही असेही नाही. मतांची टक्केवारी पाहिली तर काँग्रेसची मते अद्यापही काही प्रमाणात टिकून आहेत हे दिसते. तेलंगणात काँग्रेसला यश मिळाले असले तरी तेथेही भाजपचा प्रभाव वाढतानाच दिसतो आहे. मिझोरम हे राज्य भाजप आणि काँग्रेस या दोन्ही राष्ट्रीय पक्षांनी ऑप्शनला टाकले होते. मिझोरममध्ये भाजपला दोन आणि काँग्रेसला एकमेव जागा मिळाली. एकंदर पाच राज्यांतील निवडणुकांचा कौल पाहता मोदींचा सकारात्मकतेकडे वळण्याचा सल्ला विरोधकांना गांभीर्याने घ्यावाच लागेल कारण त्यांच्यासाठी आता लढाई पुन्हा एकदा अस्तित्व टिकवण्यासाठीचीच असणार आहे.**

# दिव्यांग बांधवांना योग्य सुविधा देण्याची गरज

**खबरबात**
**महेश शिंदे**



जिल्ह्यातील विविध बँका आणि शासकीय कार्यालय तसेच खासगी आस्थापणे अशा अनेक ठिकाणी रॅम्प आणि लिफ्ट सुविधा नसल्याने दिव्यांग बांधवांचे हाल होताना दिसत आहेत. या गैरसोयींकडे शासन स्तरावरदेखील गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी दिव्यांग संघटनांमधून होत आहे.

३ डिसेंबर हा जागतिक दिव्यांग दिन म्हणून साजरा होतो. या एका दिवशी विविध स्तरावर मोठमोठे कार्यक्रम घेऊन दिव्यांग बांधवांना शुभेच्छा देण्याचे काम केले जाते, मात्र त्यांच्या मूलभूत सुविधा आणि समस्यांकडे काही प्रमाणात दुर्लक्ष केले जात आहे. महाड तालुक्यात मोठ्या प्रमाणावर दिव्यांग बांधवांची संख्या असून त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी शासकीय कार्यालयामधून फेऱ्या माराव्या लागत आहेत. विविध दाखले जमा करताना त्यांची दमछाक होत आहे. हे दाखले मिळवण्याकरता शासकीय कार्यालयांच्या पायऱ्या लागत आहेत. शासकीय कार्यालय आणि बँका खाजगी आस्थापने या ठिकाणी दिव्यांगाना सुलभतेने प्रवेश करता येणारी यंत्रणा नसल्याने त्यांचे हाल होत आहेत. महाडमध्ये वारंवार पूर येत असल्याने या ठिकाणी अनेक कार्यालये ही दुसऱ्या मजल्यावर आहेत तर अनेक कार्यालय खाजगी जागेमध्ये आहेत तसेच राष्ट्रीयकृत आणि खासगी बँकादेखील इमारतीमध्ये असल्याने या ठिकाणी लिफ्ट आणि रॅम्प सुविधा नाही, अशा ठिकाणी जाताना त्यांना इतरांचा आधार घ्यावा लागत आहे.

महाडमध्ये तहसील कार्यालय, प्रांताधिकारी कार्यालय, वगळले तर बहुतांश कार्यालये ही दुसऱ्या मजल्यावर आहेत. महाड तालुका कृषी कार्यालय, सामाजिक वनीकरण, ग्रामीण पाणीपुरवठा, पोलीस उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, महामार्ग बांधकाम विभाग या कार्यालयामध्ये जाताना जिना चढावाच लागत आहे. त्यामुळे या कार्यालयामधून जाणे दिव्यांगाने शक्य होत नाही.

महाड शहरातील राष्ट्रीयकृत बँकांपैकी बँक ऑफ बडोदा, बँक ऑफ इंडिया, तर खासगी बँकांमध्ये सारस्वत बँक, आय.डी.बी.आय, एच.डी.एफ.सी अशा विविध बँकांमध्ये बँकांचे कामे करण्यासाठी दिव्यांगाना पायऱ्या चढावे लागत आहे. या ठिकाणी लिफ्ट सुविधा नसल्याने दिव्यांग संघटनाने लिफ्ट आणि रॅम्प सुविधा केली जावी अशी मागणी केली आहे. शहरातील दिव्यांग बांधवांची कामे ही शक्यतो महानगरपालिकेमध्ये असतात, मात्र गेली चार महिन्यांपासून येथील लिफ्ट बंद आहे. पहिल्या आणि दुसऱ्या मजल्यावर पालिकेची कार्यालय असल्याने जिना चढून जावे लागते. याबाबत तक्रारी करूनदेखील झोपेचे सोंग घेतले जात आहे असे फैज हूर्जुक यांनी सांगितले.

तालुक्यामध्ये अनेक खासगी शाळांचीदेखील तीच अवस्था आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांना शाळेत जाता यावे यासाठी व्हील चेअर आणि रॅम सुविधा असणे आवश्यक आहे, मात्र जिल्हा परिषद शाळांमधून रॅम्पचे बांधकाम करण्यात आले होते मात्र अनेक शाळांमधून हे रॅम्प तुटून गेले आहेत तर खासगी शाळांमध्ये मात्र ही सुविधा कुठे दिसून येत नाही. महाड शहरात आणि परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात खासगी इंग्रजी शाळा उभ्या राहिल्या आहेत. बहुतांश शाळा या दोन मजल्याहून अधिक मजल्यांच्या आहेत, या ठिकाणी दिव्यांग बांधवांच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार करणे गरजेचे आहे.

**महाड औद्योगिक क्षेत्रात संधी देण्याची मागणी**

महाड औद्योगिक क्षेत्र मोठ्या प्रमाणात विस्तारले गेले आहे या औद्योगिक क्षेत्रामध्ये बहुतांश कंपन्या रासायनिक उत्पादन बनवणारे आहेत, मात्र या कंपन्यांमध्ये कार्यालयामधून दिव्यांग लोकांना संधी दिली जात नाही. महाड तालुक्यामध्ये अनेक तरुण शिक्षित झालेले आहेत, मात्र त्यांना कामाची संधी उपलब्ध नाही. त्यामुळे त्यांना शासनाच्या मिळणाऱ्या पेन्शनवर आधारित राहावे लागत आहे. महाड औद्योगिक क्षेत्रामध्ये आणि कार्यालयामधून दिव्यांग तरुणांना संधी दिली गेली पाहिजे, अशी मागणीदेखील केली जात आहे.

महाड शहरामध्ये अनेक कार्यालय उंचीवर आहेत. त्यामुळे दिव्यांग व्यक्तींना पायऱ्या चढून जावे लागत आहे. त्यामुळे या ठिकाणी लिफ्ट आणि रॅम्पची सुविधा केली जावी तसेच औद्योगिक क्षेत्रामध्ये कार्यालयामधून दिव्यांग तरुणांना काम करण्याची संधी दिली गेली पाहिजे. ह्याच खरा दिव्यांगांना शुभेच्छा होतील.



# आज जागतिक मृदा दिवस

अन्नदाता, जागतिक मृदा (माती) दिवस ५ डिसेंबर रोजी साजरा केला जातो आणि हा एक महत्वपूर्ण दिवस मानला जातो. मातीचे महत्त्व, तिची गुणवत्ता या संदर्भात जनजागृती व्हावी यासाठी हा दिवस साजरा होतो. माती आपली अन्नदाता मानली जाते. प्रदूषण आणि कीडनाशकांच्या अति वापराने आणि अफाट जंगलतोडी मुळे मातीची गुणवत्ता कमी होते आहे आणि त्यामुळे जगापुढे अनेक समस्या उभ्या राहिल्या आहेत. मातीची सुपीकता कमी होते आहे आणि खाद्यान्न सुरक्षेचा मोठा प्रश्न जगापुढे आहे. मातीचे महत्व पटवून देणे, मृद संधारण म्हणजे मातीचे जतन हे मोठे आव्हान आहे.

यासाठीच वर्ल्ड सॉईल डे २०१४ पासून साजरा होत आहे. या वर्षीची थीम 'सॉईल व्हेअर फूड बिगिन्स' अशी आहे. आरोग्यपूर्ण इको सिस्टीम, मानवासाठी आरोग्यदायी वातावरण अशी यामागची कल्पना आहे. २००२ साली इंटरनॅशनल युनियन ऑफ सॉइल सायन्सने वर्ल्ड सॉइल डे चा प्रस्ताव मांडला होता. मात्र तो मंजूर होण्यास २०१३ साल उजाडावे लागले. फूड अँड अॅग्रीकल्चर ऑर्गनायझेशनने ६८ व्या संयुक्त राष्ट्र महासभेत पुन्हा त्याविषयी आग्रह धरला. त्यानंतर ५ डिसेंबर २०१४ रोजी त्याची अधिकृत घोषणा केली गेली.

या दिवसासाठी ५ डिसेंबर ही तारीख ठरविण्या मागचे कारण म्हणजे थायलंडचे दिवंगत राजे भुमिबोल अदुल्यासेन यांचा हा जन्मदिवस. जागतिक मृदा दिन साजरा व्हावा यासाठी भुमिबोल यांनी मोठे योगदान दिले होते.

दरवर्षी ५ डिसेंबर रोजी जागतिक मृदा दिवस साजरा केला जातो. जागतिक अन्नसुरक्षेच्या दृष्टीने मृदेचं महत्व अन्यसाधारण असं आहे. अलिकडच्या काळात झपाट्याने वाढतच चालेले शहरीकरण, सिमेंटचे रस्ते यामुळे मृदेची अधिक प्रमाणात झीज होत आहे. त्याचबरोबर शेतीमध्ये वापरण्यात येणारी भरमसाठ रासायनिक खते, शहरीकरणासाठी आणि उद्योगधंद्यांसाठी करण्यात येणारी जंगलतोड आणि इतर अनेक कारणांमुळे मृदेची झीज होण्याची प्रक्रिया मोठ्या प्रमाणात सुरु आहे. केवळ एक इंच सुपीक मृदेचा थर तयार होण्यासाठी ८०० ते १००० वर्षांचा कालावधी लागतो.

मानवाच्या बदलत्या जीवनशैलीचा परिणाम, पर्यावरणाचा ऱ्हास आणि अशा प्रकारच्या इतर अनेक कारणांमुळे मृदेची झीज मोठ्या प्रमाणावर होतेय. त्यामुळे यासंदर्भात जागरुकता करण्याच्या दृष्टीने २०१३ साली सयुंक्त राष्ट्राच्या महासभेत ५ डिसेंबर हा जागतिक मृदा दिवस साजरा करण्याचा संकल्प करण्यात आला. फूड अॅन्ड अॅग्रीकल्चर ऑर्गनायझेशन अर्थात अन्न आणि कृषी संघटनेच्या वतीनं या दिवसाचे आयोजन केलं जातं. शेतकऱ्यांसोबतच सामान्य माणसांमध्येही मृदेसंबंधी जागरुकता करण्याचा उद्देश आहे.

मृदेचं संरक्षण म्हणजे संपूर्ण सजीवांचं संरक्षण असाच अर्थ होतोय. जगातील ९५ टक्के अन्नधान्य मृदेच्या माध्यमातून येतं. तसेच मृदेत पृथ्वीवरील एकूण सजीवांपैकी २५ टक्के सजीव आसरा घेतात. फळे, भाज्या आणि अन्नधान्याची गुणवत्ता ही मातीच्या गुणवत्तेवरुन ठरते. सध्या या मृदेच्या संवर्धनासमोर वातावरण बदलाचं मोठं आव्हान उभं आहे.

**(साभार : इंटरनेट)**

## बदलते तंत्रज्ञान

# २०२३मध्ये 'हे' ठरले सर्वोत्कृष्ट गेम्स व अॅप्स!

यंदाचे म्हणजेच २०२३ च्या सर्वोत्कृष्ट गेम्स, अॅप्सची निवड पल आणि गुगलने केलेली आहे. सर्व अॅपल अॅप स्टोअर पुरस्कारांमध्ये, कम्युनिटीद्वारे चालवले जाणारे आणि बाहेर फिरण्याची आवड असणाऱ्या लोकांना मार्गदर्शन करणारे ऑलट्रेल्स या अॅपने जागा पटकावली असून, प्रीट–ए–मेकअप अॅपला यावर्षीचे सर्वोत्कृष्ट आयपॅड अॅप म्हणून स्थान मिळाले आहे. फोटोमेटर हे अॅप, पलचे मॅक ऑफ द इयर म्हणून घोषित करण्यात आले आहे. मुबीला, अॅपल अॅप ऑफ द इयर म्हणून मान मिळाला आहे.



गेमिंग विभागामध्ये होनकाई: स्टार रेल याला सर्वोत्कृष्ट गेमचा मान मिळाला असून, लॉस्ट इन प्लेला यावर्षीचा 'आयपॅड ऑफ द इयर' म्हणून घोषित केले आहे. लाईज ऑफ पी या गेमला मॅक गेम ऑफ द इयर म्हणून मान मिळाला आहे. अॅपल आर्केडचा, हॅलो किट्टी आयलंड अॅडव्हेन्चर या गेमला पल आर्केड ऑफ द इयर म्हणून घोषित केले गेले आहे.

होनकाई : स्टार रेलने इथेदेखील सर्वोत्कृष्ट गेम म्हणून विजेतेपद पटकावले आहे. अॅपेक्स लिजंड मोबाइल, या बॅटल रॉयल गेम मोबाइल व्हर्जनला, गुगल प्लेचा युजर्स चॉईस हा पुरस्कार मिळाला असून, फारलाईट ८४ फास्ट पेस्ड अॅक्शन शूटर गेमने गुगल प्लेचा स्टॅन्ड आउट हा पुरस्कार मिळवला आहे. तर व्हॅम्पायर सर्व्हाइवर या शूटर गेमला गुगल प्ले इंडी गेम ऑफ द इयर हा पुरस्कार देण्यात आला आहे.

सर्वोत्कृष्ट फन पसाठी, बंबल फॉर फ्रेंड्स : मीट या अॅपची निवड करण्यात आली आहे. रिस्ली रील मेकर व्हिडीओ एडिटर अॅपचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे. मानसिक आरोग्याच्या दृष्टीने विचार केल्या गेलेल्या, व्हॉईडपेट गार्डन या अॅपला 'बेस्ट फॉर ग्रोथ' या विभागात सन्मानित करण्यात आले असून, इंप्रिंट : लर्न व्हिज्युअली या पचादेखील विशेष उल्लेख केला गेला.

'बेस्ट प फॉर गुड' या विभागामध्ये एवर्ल्ड या पचा समावेश करण्यात आला आहे. व्हॉट्सप मेसेंजर या अॅपला 'बेस्ट फॉर वॉचेस' म्हणून नावाजले गेले आहे. चित्रकला, नोट लिहिणे आणि स्केचिंग या विविध माध्यमांसाठी, 'बेस्ट फॉर टॅबलेट्स' या विभागात कॅनोवा आणि एव्हरअँड या दोन अॅप्सचा विशेष उल्लेख केला आहे, 'बेस्ट क्रोम बुक्स' या विभागात निमेशन तयार करणाऱ्या फ्लीपाक्लिप या पला पुरस्कार देण्यात आला असून, एव्हरनोट आणि व्हिडीओ यांचा विशेष उल्लेख ऑर्गनायझेशनल आणि क्रिएटिव्ह अॅप म्हणून केला गेला आहे.

# नोबेल पारितोषिक विजेते नेल्सन मंडेला



**निमित्त**

नेल्सन रोलिहलाहला मंडेला हे दक्षिण आफ्रिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष म्हणून वर्णभेद विरोधी नेते होते. १९९४ ते १९९९ पर्यंत ते देशातील पहिले कृष्णवर्णीय राष्ट्रप्रमुख होते आणि पूर्णपणे प्रातिनिधिक लोकशाही निवडणुकीत निवडून आलेले पहिले होते. त्यांच्या सरकारने वांशिक सलोखा वाढवून वर्णभेदाचा वारसा नष्ट करण्यावर लक्ष केंद्रित केले. वैचारिकदृष्ट्या आफ्रिकन राष्ट्रवादीआणि समाजवादी, त्यांनी १९९१ ते १९९७पर्यंत आफ्रिकन नॅशनल काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष म्हणून काम केले. दरवर्षी १८ जुलै रोजी जगभरातनेल्सन मंडेला आंतरराष्ट्रीय दिवस साजरा केला जातो. आज या लेखात आपण नेल्सन मंडेला यांचे जीवनचरित्र पाहणार आहे.

दक्षिण आफ्रिकेतील शतकानुशतके जुन्या वर्णभेदाला विरोध करणारे महान जननेते नेल्सन मंडेला यांचा जन्म १८ जुलै १९१८ रोजी दक्षिण आफ्रिकेतील इस्टर्न केप, मेवेझो येथे झाला. त्याचे वडील गेडला हेन्री म्फकेनिस्वा हे म्वेजो शहराचे आदिवासी सरदार होते.

हेन्रीची तिसरी पत्नी नेकुफी नोस्केनी हिच्या पोटी मंडेला यांचा जन्म झाला. नेल्सन मंडेला हेन्रीच्या १३व्या मुलांपैकी तिसरे होते. सरदारांच्या मुलाला स्थानिक भाषेत मंडेला म्हणत. ज्यावरून त्याला त्याचे आडनाव मिळाले.मंडेला यांचे वडील त्यांना 'रोलिहला' या नावाने हाक मारायचे. त्याची आई मेथोडिस्ट होती.मंडेला यांनी त्यांचे प्रारंभिक शिक्षण क्लार्कबेरी मिशनरी स्कूलमधून पूर्ण केले.

देशातील परिस्थिती पाहून नेल्सन मंडेला १९४१ मध्ये जोहान्सबर्गला गेले. जेथे ते वॉल्टर सिसुलू आणि वॉल्टर अल्बर्टाइन यांना भेटले, ज्यांच्या प्रभावाने त्यांनी देशातील रंगाच्या आधारावर भेदभाव दूर करण्यासाठी राजकारणात प्रवेश केला. दक्षिण आफ्रिकेतील स्वातंत्र्याच्या लढ्याशी एकजुटीची आंतरराष्ट्रीय चळवळ ही जगाने पाहिलेली सर्वात मोठी सामाजिक चळवळ होती.जगभरातील अक्षरशः प्रत्येक देशाचा विविध स्वरूपात वर्णभेद विरोधी क्रियाकलापांचा इतिहास आहे.

बऱ्याच देशांमध्ये, वर्णभेद विरोधी क्रियाकलाप अनेक प्रकारच्या दडपशाहीविरूद्ध स्थानिक संघर्षांशी (औपचारिक किंवा अनौपचारिकपणे) जोडलेले होते. बहुतेक वर्णभेदविरोधी चळवळींनी त्यांचे कार्य दक्षिण आफ्रिकेपुरते मर्यादित ठेवले नाही, परंतु दक्षिण आफ्रिकेतील मुक्ती चळवळीला अधिक व्यापकपणे समर्थन दिले. नेल्सन मंडेला यांना त्यांच्या वर्णभेदविरोधी कार्यामुळे ते वारंवार अधिकाऱ्यांचे लक्ष्य बनले. १९५२च्या सुरुवातीस त्यांच्यावर अधूनमधून बंदी घालण्यात आली होती. म्हणजे त्यांना प्रवास, सहवास आणि भाषणात प्रतिबंधित करण्यात आले होते. त्यांना डिसेंबर १९५६मध्ये इतर शंभरहून अधिक लोकांसह देशद्रोहाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती, ज्याची रचना रंगभेदविरोधी कार्यकर्त्यांना त्रास देण्यासाठी करण्यात आली होती. त्याच वर्षी, त्याच्यावर खटला चालला आणि अखेरीस १९६१मध्ये त्याची निर्दोष सुटका झाली. त्यांच्या जीवनात, मंडेला यांना त्यांच्या राजकीय कामगिरीबद्दल २५०हून अधिक पुरस्कार, प्रशंसा, बक्षिसे, मानद पदवी आणि नागरिकत्व देण्यात आले.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**मुरूड : गेल्या आठवड्यात आलेल्या सलग सुट्ट्यांमध्ये प्रसिद्ध काशिद समुद्रकिनारी पर्यटकांनी गर्दी केली होती. त्याचे सौरभ नाझरे यांनी ड्रोनच्या सहाय्याने घेतलेले छायाचित्र.**

## आरोग्य प्रहर



# हिवाळ्यात आले खाल्ल्याने मिळतील अनेक लाभ

हिवाळ्यात फक्त सर्दी–खोकलाच नाही तर इतरही अनेक आजार आपल्याला पटकन ग्रासतात. अशा परिस्थितीत शरीर निरोगी ठेवण्यासाठी पौष्टिक आहार घेण्याचा सल्ला दिला जातो. या ऋतूमध्ये अशा अनेक गोष्टी आहेत, ज्या शरीराला थंडीपासून बचाव करून निरोगी ठेवतात. यापैकी एक गोष्ट म्हणजे आले. सोडियम, अँटी–इंफ्लेमेटरी, अँटी–ऑक्सिडंट, पोटॅशियम, व्हिटॅमिन बी, सी, फोलेट, झिंक आणि मॅग्नेशियम यांसारखे गुणधर्म असलेले आले हिवाळ्यात अनेक आजारांपासून बचाव करू शकतात. जाणून घ्या अद्रकाचे कोणते फायदे आहेत.

**रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते**

हिवाळ्यात आल्याचे सेवन केल्याने शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. यामुळे शरीर रोगांशी लढण्यास सक्षम होते आणि निरोगी राहते. अशा परिस्थितीत या हंगामात आल्याचे सेवन करण्याचा सल्ला दिला जातो.

**सर्दी आणि खोकल्यापासून आराम**

आले हे आयुर्वेदात खूप फायदेशीर मानले जाते. हिवाळ्यात आल्याचे सेवन केल्याने सर्दी आणि खोकल्यापासून आराम मिळतो. यासाठी आल्याचा चहा आणि आल्याचा उष्टा पिणे फायदेशीर मानले जाते. यामुळे सर्दी होत नाही आणि शरीर संसर्गापासून स्वतःचे संरक्षण करू शकते.

**फॅटी लिव्हरच्या समस्येपासून सुटका मिळेल**

हिवाळ्यात गरम चहामध्ये आल्याचा तुकडा टाकून तो पिणे फायदेशीर मानले जाते. जेवणानंतर एक तासाने याचे सेवन करणे अनेक प्रकारे फायदेशीर ठरू शकते. असे केल्याने फॅटी लिव्हरची समस्याही दूर होऊ शकते.

**बद्धकोष्ठता दूर होते**

थंडीच्या काळात आहारात बदल होतो, त्यामुळे बद्धकोष्ठता, गॅस, अपचन, बद्धकोष्ठता अशा समस्यांनी लोक हैराण झाल्याचे पाहायला मिळत आहे. अशा परिस्थितीत आल्याचे सेवन केल्यास या समस्यांपासून सुटका मिळू शकते.

# काशिदच्या समुद्रकिनारी सुरूच्या झाडांना धोका

## वाहने पार्किंग करताना खबरदारी घेण्याची गरज

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड पर्यटन क्षेत्रामधील काशिद हा प्रसिद्ध समुद्राकिनारा ओळखला जातो. याकिनारी शनिवार व रविवारी शेकडो पर्यटक स्वतःच्या वाहनाने ये-जा करित असतात, पण काही पर्यटक बेजबाबदारपणे सुरूच्या झाडांना धक्का लागेल, अशा स्थितीत आपली वाहने पार्क करीत असल्याने ही झाडे कमकुवत होत आहेत. या पार्किंगमुळे सुरूच्या झाडांना धोका निर्माण झाला आहे.

काशिद समुद्राकिनाऱ्याजवळ असणाऱ्या आकर्षक अशी सुरूची झाडे ही पर्यटकांना भुरळ घालत असतात. या झाडाखाली बसले की, एक सुखद आनंद याठिकाणी मिळत असतो. त्याचा आनंद कुठल्याच पर्यटन क्षेत्रावर मिळत नसल्याने या ठिकाणी दिवसेंदिवस पर्यटकांच्या संख्येत वाढ होत आहे, परंतु आलेल्या पर्यटकांना वाहतूक कोंडीची समस्या जास्तच जाणवत असते. अनेक वेळा ही वाहने सुरूच्या झाडाजवळ उभी केली जातात. गाडी काढते वेळी चालकांकडून सुरूच्या झाडांना धडकत असल्याने ही झाडे कमकुवत होत आहेत. या सुरूच्या झाडांना वाचवणे क्रमप्राप्त आहे.

## जनावरांसाठी वंध्यत्व निवारण शिबिराचे आयोजन

**रायगड** : महाराष्ट्र शासन व रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील १२२ पशुवैद्यकीय दवाखान्यांमार्फत १९ डिसेंबरपर्यंत प्रत्येक गावात एक वंध्यत्व निवारण शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी केले आहे. जिल्ह्यातील पशुपालकांनी आपल्या जनावरांचे वंध्यत्व निवारण करून दुग्ध उत्पादन वाढविण्याच्या या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा. या कार्यक्रमाचे सर्व नियोजन जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सचिन देशपांडे व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी रायगड जिल्हा परिषद डॉ. श्यामराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी आपण नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पोलीस विभागात भरतीच्या बहाण्याने केली फसवणूक

**पेण : प्रतिनिधी**

पोलीस विभागात भरती करण्याच्या बहाण्याने पेण तालुक्यातील दादर येथील एका तरुणाची दीड लाखांची फसवणूक केल्याची घटना घडली आहे.

पोलीस विभागात आपली भरती व्हावी म्हणून आरोपी (भिवंडी) याने फिर्यादी (रा. दादर, ता. पेण) याला त्याची मंत्रालयात ओळख आहे असे खोटे सांगून दिशाभूल केली. आरोपीने फिर्यादीकडून फेब्रुवारी ते डिसेंबर २०२३दरम्यान एकूण एक लाख ५० हजार रुपये घेऊन फसवणूक केली आहे. याबाबत गुन्हा दाखल झाला असून अधिक तपास सुरू आहे.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**EXTENSION TO E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs. 500/- + GST

| Sr.No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1. | Tender No. & Name of Tender | **Rfx No: -7000028870 Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-50/2023-2024.** Extension to Supply of Petrol Brush Cutter (Grass Cutting machine) at various Substation and Painting machine at 220kV Apta Substation under EHV (O&M) Division Panvel. Tender amount Rs. 4,48,897/-,EMD amount Rs. 5,000/-. |
| 2. | Online Downloading the RFx | **05.12.2023, 18:00 Hrs. to 12.12.2023, 23:59 Hrs.** |
| 3. | Online Submission of the RFx | **On or Before 12.12.2023 up to 23:59 Hrs.** |
| 4. | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **13.12.2023 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- https://srmetender.mahatransco.in **Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410. **Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**(A.P. JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**E.H.V.(O&M) DN. PANVEL**



जावक क्रमांक/ २३४३/२०२३
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
रायगड
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय, रायगड विभाग, कल्पतरु इमारत,
मुख्य पोस्ट ऑफीसजवळ, अलिबाग, रायगड.
दि. ४/१२/२०२३

**चौकशीची जाहीर नोटीस**

एस. आर. एन. क्रमांक : RGD/13626/18/23
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक:. 368/2023
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक समिरा फाऊंडेशन पनवेल बाबत
न्यासाचा पत्ता : रॉयल ओझोन लाइफस्पेस एलएलपी, बिल्डींग नं २ ए, फ्लॅट नं ३०३,
ॲट पोस्ट - शिरढोण, रायगड, पनवेल, शिरढोण
अर्जदार - समिरा सचिन चव्हाण,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, रायगड, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-
(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|
| (अ) जंगम मिळकत: रोख रु. /- मात्र (अक्षरी रुपये मात्र फक्त) | |

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|

(ब) स्थावर मिळकत रोख रु. /- मात्र
(अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०४-१२-२०२३ रोजी दिली

शिक्का

**सही/-**
**(रा. ल. जाधव)**
अधिक्षक (प्र.)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
रायगड



**पेपर नोटीस**

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली सामाईक मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **गणेश गुरुनाथ पाटील** आणि इतर यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

मिळकतीचे वर्णन : मौजे: पिरकोन (५५३३३९)
(ULPIN २६३०९७२६७४७), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट कमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २२२/८/अ | १ | ०.३६.४० पो.ख. ०.०४.०० | ०.०६ |
| | | **एकुण ०.४०.४०** | |

**एकुण क्षेत्र ०.४०.४० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०४ डिसेंबर २०२३

**सही**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक-३३/३४, सेक्टर २२,
कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड-४१०२०६.
मो. क्र. ९९२०४७५८०१



**पेपर नोटीस**

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली सामाईक मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **धर्मा तुळशीराम डाकी आणि इतर** यांचेकडून संतोष संपत वैद्य, ज्योती कुंदन फटांगरे, प्रगती अमोल नरवडे कायमस्वरुपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार आमचे अशिल यांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक **धर्मा तुळशीराम डाकी आणि इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

मिळकतीचे वर्णन : मौजे विंधणे (५५३३२४)
(ULPIN २९७५२५३४४९०), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट कमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २७९/३ | १ | ०.३९.६० पो.ख. ०.०२.५० | २.८९ |
| | | **एकुण ०.४२.१०** | |

**या एकुण ०.४२.१० क्षेत्रापैकी विक्रेते यांच्या हिश्याचे ०.१९.५० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०५ डिसेंबर २०२३

**सही**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक-३३/३४, सेक्टर २२,
कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड-४१०२०६.
मो. क्र. ९९२०४७५८०१



**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद**
**ता. पनवेल, जि. रायगड**
**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहीतील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**नोव्हेंबर २०२३**

| अ.क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक | मालमत्ता वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| १ | सुनिल तान्हाजी मेटांगळे रुपाली सुनिल मेटांगळ | रुक्मिणी पांडुरंग पवार | पवल२- ७१३१-२०२१ | ११/५/२०२१ | सदनिका क्र. ०३,तळ मजला,दत्त दर्शन, मौजे शिलोत्तर रायचूर, सुकापूर |
| २ | रविंद्र खंडू वाळुंज, रत्ना रविंद्र वाळुंज | टी.के. माधवन मयत यांचे कायदेशीर वारस कैलास माधवन थडतील, तांगामनी माधवन थडतील, यशोदा बिनेश | पवल२- १७७२४-२०२३ | ११/१०/२०२३ | सदनिका क्र. ०६,तळ मजला,डी २, बिल्डींग स्नेहमिलन को.हौ.सो.युगांतक हौसिंग कॉम्प्लेक्स, मौजे पालीदेवद |
| ३ | विजय तुलसी बारिया, मयूर विजय बारिया, मधु विजय बारिया | मे.आगा रियालिटी तर्फे तौसिफ जलालुद्दीन आगा | पवल२- १६१४४-२०२२ | २३/११/२०२२ | सदनिका क्र. ४०८,चौथा मजला,ओम साई रेजेन्सी,मौजे शिलोत्तर, रायचूर, सुकापूर |
| ४ | सुयोग यशवंत पाटील, सरिता सुयोग पाटील | लक्ष्मण दामाजी धुरी तर्फे कु.मु.विनिता विनोद गवस | पवल२- १८३१९-२०२३ | १९/१०/२०२३ | सदनिका क्र. ए २०४,दुसरा मजला, ए विंग ओम स्वागत कॉम्प्लेक्स, त्रिमुर्ती को.हौ.सो. मौजे पालीदेवद, सुकापूर |
| ५ | मनोज हरिभाऊ कातकर, कविता मनोज कातकर | संदिप शामराव रावण, अनिता संदिप रावण | पवल३- १३५८४-२०२३ | २४/७/२०२३ | सदनिका क्र. ए ०१, तळ मजला, ए विंग,बि.नं. ३,कार्तिक्य पार्क को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर, सुकापूर. |
| ६ | आरती जिगर धाडवे | मे.रामरत्न बिल्डर्स तर्फे विनोद तुकाराम चांदे | पवल३- १९५५७-२०२२ | २२/११/२०२२ | सदनिका क्र. ३०९,तिसरा मजला,सी विंग, श्री वसंत विहार को.हौ.सो.मौजे शिलोत्तर रायचूर, सुकापूर |
| ७ | विनोद हिम्मतराव पाटील यांचे तर्फे कु.मु.बालाजी गोरोबा घाटे | मे.आयकॉन स्पेस डेव्हलपर्स तर्फे डायरेक्टर राजेश यादव व संतोष कुमार शेट्टी तर्फे धनंजय भरत महानवर | पवल५- ९५४३-२०१७ | २७/१०/२०२७ | सदनिका क्र. २०१,दुसरा मजला,बि.विंग, बि.नं.५, साई इन्क्लेव्ह को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर, सुकापूर |
| ८ | पप्पू राम कुमावत, सीता पी. देवी | सुनिल शिवाजी कांबळे, योगिता सुनिल कांबळे | पवल२- १७१५०-२०२३ | ३/१०/२०२३ | सदनिका क्र.बी २०४,दुसरा मजला,बि.नं.४, स्वर्णभूमी कॉम्प्लेक्स, सुंदरम को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर, सुकापूर |
| ९ | प्रदीप साहेबराव ठाकरे, एन.के. भूषण (१ ले मालक) | इमिलीनो रॉड्रिग्ज | | | शॉप नं. एस २, तळ मजला, बि.नं.६, प्रेरणा को.हौ.सो.लि., मौजे पालीदेवद |
| | करमशी आनंदजी पटेल, केशर करमशी पटेल (२ रे मालक) | प्रदीप साहेबराव ठाकरे एन.के. भुषण | पवल४- १०४५१-२०१५ | २०/८/२०१५ | |
| १० | गीता अजित ठोकूर, अजित आत्माराम ठाकूर | केशव शिवराम डाउर, शारदा केशव ठाकूर | पवल२- १७२८४-२०२३ | ५/१०/२०२३ | सदनिका क्र.बी २०४,दुसरा मजला, ए विंग श्रेयश होम्स को.हौ.सो. मौजे पालीदेवद,सुकापूर |
| ११ | जनार्दन दत्ताराम सोलकर, पूजा जनार्दर सोलकर | मे.रामरत्न बिल्डर्स तर्फे रमेश गणपत नाचरे | पवल३- २०४६२-२०२२ | ६/१२/२०२२ | सदनिका क्र. ३०९,तिसरा मजला,बी विंग, श्री वसंत विहार को.हौ.सो. मौजे शीलोत्तर रायचूर, सुकापूर |
| १२ | संतोष लक्ष्मण दिवेकर, ज्योती संतोष दिवेकर, प्रतीक संतोष दिवेकर | मे.आगा रियालिटी तर्फे तौसिफ जलालुद्दीन आगा | पवल३- ११७९३-२०२३ | २८/६/२०२३ | सदनिका क्र.१०५,पहिला मजला,ओम साई रेजेन्सी, मौजे शिलोत्तर सुकापूर |
| १३ | आशिष नंदकुमार मेश्राम, नंदकिशोर पांडुरंग मेश्राम | अभिनय कुमार लाल दास, विभा रश्मी | पवल२- १६९२८-२०२३ | २६/९/२०२३ | रो हाउस नं.२२, विघ्नहर्ता इन्क्लेव्ह, फेज ४, को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| १४ | नम्रता नंदकुमार जाधव, नंदकुमार नारायण जाधव | अशोक कृष्णा महाडिक | पवल२- १६२००-२०२३ | १३/९/२०२३ | सदनिका क्र.१०३,पहिला मजला, बी विंग, बि.नं.१,स्वानंदभूमी को.हौ.सो.,मौजे पालीदेवद |
| १५ | दिपाली अमिताभ मोरे, अमिताभ निवृत्ती मोरे | यशवंत रामचंद्र चेंदवणकर, अजिता यशवंत चेंदवणकर | पवल५- ८८७९-२०१८ | ५/८/२०१८ | सदनिका क्र. ३०२,तिसरा मजला,सी विंग, बि.नं.१,कार्तिक्य पार्क को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| १६ | विनोद शामदर्श त्रिपाठी, कंचन विनोद त्रिपाठी | संतोष शर्मा | पवल४- ८८६६-२०२२ | ११/७/२०२२ | सदनिका क्र. बी १,बि.नं. जी ०४,श्रीनिकेतन, को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| १७ | योगेश्वर रविंद्र झुरी | प्रमोद गजानन वनगे | पवल२- १९०१३-२०२३ | ३०/१०/२०२३ | सदनिका क्र.१०७,पहिला मजला,ए विंग,प्रयाग आंगण को.हौ.सो.,मौजे शिलोत्तर रायचूर |
| १८ | चेतन निवृत्ती वैरी, वर्षा चेतन वैरी | मे.रामरत्न बिल्डर्स तर्फे विनोद तुकाराम चांदे | पवल३- ५१४-२०२३ | ९/१/२०२३ | सदनिका क्र. ३०१,तिसरा मजला,ए विंग, श्री वसंत विहार को.हौ.सो.,मौजे शिलोत्तर रायचूर |
| १९ | विनायक विठ्ठल गोंधळी, जयश्री विनायक गोंधळी | मेघना शरद जाधव, मंगल शरद जाधव | पवल२- १९४८१-२०२३ | ३/११/२०२३ | रो हाउस नं.१४, श्री ओमकार रो हाउस को. हौ.सो.,मौजे पालीदेवद |
| २० | दयानंद भाउराव जाधव, नंदिनी दयानंद जाधव | प्रतीक गोयल, सुरेंद्र कुमार गोयल, सारिका राजवंशी | पवल४- १६०९४-२०२३ | १६/११/२०२३ | सदनिका क्र. १२०२,१२ वा मजला,जरना को.हौ.सो.,बालाजी सिम्फोनी, मौजे शिलोत्तर रायचूर |
| २१ | निकेश हरिश्चंद्र धोत्रे, चित्रा हर्षराज खैरे | संजय अर्जुन बेरड, वैशाली संजय बेरड | पवल१- ४४५४-२०२३ | २६/५/२०२३ | सदनिका क्र.बी ०१, तळ मजला,कार्तिक्य पार्क को.हौ.सो.,बि.नं.२, मौजे शिलोत्तर रायचूर |
| २२ | दिनेश गंगाराम जाधव दयानंद गंगाराम जाधव | शोभा संतोष कर्णे, संतोष किसन कर्णे | पवल२- १९३६४-२०२३ | २/११/२०२३ | सदनिका क्र. ३०४,तिसरा मजला,ए विंग, इम्पेरियल सोसायटी,मौजे शिलोत्तर रायचूर |
| २३ | दिपक हरिश्चंद्र गायकवाड, गणेश हरिश्चंद्र गायकवाड | चंद्रकांत चाहू पोपेटा | पवल२- २०३४६-२०२३ | २१/११/२०२३ | गाळा नं.०५,तळ मजला, पोपेटा प्रॉपर्टीज, मालमत्ता क्र.७३, शिलोत्तर रायचूर |
| २४ | सुचित चंद्रकांत कनगुटकर, राखी सुचित कनगुटकर | प्रसन्ना व्ही. नायर, पूजा विजय कुमार नायर | पवल३- १३११३-२०२३ | १४/७/२०२३ | सदनिका क्र. के १२०१,बारावा मजला,के विंग बालाजी सिम्फोनी, मौजे शिलोत्तर रायचूर |
| २५ | राहुल सहदेव कांबळे | अविनाश यादव शेळके | पवल१- ३३७५-२०१६ | ७/५/२०१६ | सदनिका क्र. ई ०२,तळ मजला, प्रेरणा बिल्डींग,न्यू प्रेरणा को.हौ.सो.,मौजे पालीदेवद |
| २६ | सुरज नरेंद्र बैकर, योगेश नरेंद्र बैकर,नरेंद्र महादेव बैकर | राधिका सागर चौधरी | पवल१- १००९६-२०२३ | २३/११/२०२३ | सदनिका क्र. सी ००१,तळ मजला, सी विंग गंगा दर्शन को.हौ.सो., मौजे पालीदेवद |
| २७ | मंगेश चंद्रकांत सावंत | मे.अरबुदा होम्स तर्फे मुकेश हिम्मतराव चौधरी | पवल२- ९६८८-२०२३ | ६/६/२०२३ | सदनिका क्र.१०६,पहिला मजला, मोहित इन्क्लेव्ह को.हौ.सो.,मौजे पालीदेवद |
| २८ | नाजरुल शेख, अंदादुल शेख | मे.अरबुदा होम्स तर्फे मुकेश हिम्मतराव चौधरी | पवल३- १३४६१-२०२३ | २४/७/२०२३ | सदनिका क्र.३०६, तिसरा मजला, मोहित इन्क्लेव्ह को.हौ.सो., मौजे पालीदेवद |
| २९ | सिद्धांत मंगेश खेडेकर, मृण्मयी मंगेश खेडेकर, मंगेश दत्तात्रय खेडेकर | मे.अरबुदा होम्स तर्फे मुकेश हिम्मतराव चौधरी | पवल२- १७१०१-२०२३ | ३/१०/२०२३ | सदनिका क्र. ४०६,चौथा मजला, मोहित इन्क्लेव्ह को.हौ.सो., मौजे पालीदेवद |
| ३० | शुभम जीवण गांगण, रुचिरा संजय गांधी | मे.अरबुदा होम्स तर्फे मुकेश हिम्मतराव चौधरी | पवल२- १७१०३-२०२३ | ३/१०/२०२३ | सदनिका क्र. ४०१,चौथा मजला, मोहित इन्क्लेव्ह को.हौ.सो., मौजे पालीदेवद |
| ३१ | राजेश्वर नारायण पाटील, गितांजली राजेश्वर पाटील | मे.अरबुदा होम्स तर्फे मुकेश हिम्मतराव चौधरी | पवल२- ११३७५-२०२३ | ३०/६/२०२३ | सदनिका क्र. २०३, दुसरा मजला, मोहित इन्क्लेव्ह को.हौ.सो., मौजे पालीदेवद |
| ३२ | कृष्णा जानू पाटील, मनिषा कृष्णा पाटील | मे. अरबुदा होम्स तर्फे आकाश किशोर चौधरी, सचिन पद्माकर पाटील, टिकाराम विरामजी चौधरी, मुकेश हिम्मतराव चौधरी | पवल२- १४३३७-२०२३ | १८/८/२०२३ | सदनिका क्र. ३०१,तिसरा मजला, मोहित इन्क्लेव्ह को.हौ.सो., मौजे पालीदेवद |
| ३३ | लक्ष्मी धोंडीराम शिंदे | मे. अरबुदा होम्स तर्फे मुकेश हिम्मतराव चौधरी | पवल२- १५११७-२०२३ | ३१/८/२०२३ | सदनिका क्र. ४०५,चौथा मजला, मोहित इन्क्लेव्ह को.हौ.सो., मौजे पालीदेवद |
| ३४ | शशिकला चन्नप्पा शिंत्रे | मारुती बालप्पा शिंत्रे | पवल५- १९३२-२०२० | ११/२/२०२० | सदनिका क्र. १०२,पहिला मजला, ए विंग, त्रिमूर्ती को.हौ.सो., मौजे पालीदेवद |
| ३५ | सरिता विजय पाटील, निमेश विजय पाटील, मैथिली विजय पाटील | विजय मंगल पाटील | वारस प्रमाणपत्र दिवाणी चौकशी अर्ज क्र.८४६/२०२३ | २१/१०/२०२३ | सदनिका क्र. ११,पहिला मजला,बि.नं.बी १, त्रिदेव को.हौ.सो.,युगांतक कॉम्प्लेक्स, मौजे पालीदेवद |
| ३६ | सुरेखा सुरेश सोनावणे, अविनाश सुभाष सोनावणे | सुभाष पुजा सोनावणे | वारस प्रमाणपत्र दिवाणी चौकशी अर्ज क्र. १०७१/२०२३ | ६/१०/२०२३ | सदनिका क्र.सी १०३,पहिला मजला,बि.नं. एफ, ओम शिवा कॉम्प्लेक्स कॉ.हौ.सो., मौजे पालीदेवद |
| ३७ | विजय नारायण पवार | लक्ष्मण नारायण पवार | पवल१- ३८०५-२०१९ | ११/४/२०१९ | घर क्र. ७७/८/१०५, मौजे शिलोत्तर रायचूर |
| ३८ | सिताराम नारायण पवार | लक्ष्मण नारायण पवार | पवल१- ३८०५-२०१९ | ११/४/२०१९ | घर क्र. ७७/१६/२०४, मौजे शिलोत्तर रायचूर |
| ३९ | प्रतिक्षा लक्ष्मण पवार | लक्ष्मण नारायण पवार | पवल१- ३८०५-२०१९ | ११/४/२०१९ | घर क्र. ७७/२४/३०५, मौजे शिलोत्तर रायचूर |

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असल्यास सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(सुदिन धनाजी पाटील)**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**(सौ. योगिता राजेश पाटील)**
**सरपंच**
**ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल. जि. रायगड**

## निवडक

### वाशीतील भंगार साहित्याला आग

**नवी मुंबई :** वाशी कोपरखैरणे रस्त्यावरील सैक्टर १४ येथील महापालिकेच्या वापरात नसलेल्या इमारतीमधील तळ मजल्यावरील भंगार साहित्याला शनिवारी (दि. २) सकाळी आग लागल्याची घटना घडली. इमारत वापरात नसल्याने सुदैवाने कोणतीही गंभीर घटना घडली नाही. या परिसरात पेट्रोल पंप असल्याने काही काळ नागरिकांमध्ये भीतीचे निर्माण झाली होती. भाजपाचे माजी नगरसेवक प्रकाश मोरे यांनी अग्निशमन विभागाला कळविले. अग्निशमनच्या दोन गाड्या घटनास्थळी दाखल होऊन आगीवर नियंत्रण मिळविले.

### बजरंग भागवत अध्यक्षपदी

**पनवेल :** तालुका कुंभार समाज अध्यक्षपदी बजरंग मुरलीधर भागवत यांची निवड करण्यात आली. ही निवड



परळी-सुधागड येथे तालुका सभेमध्ये जिल्हा अध्यक्ष अनंत महाडकर, तशेच कोकण विभाग कुंभार समाज अध्यक्ष राजेंद्र मांगरुळकर, जिल्हा सदस्य रामदास साळवी प्रदेश युवा संपर्क प्रमुख सतीश येलमकर, जिल्हा सल्लागार राजेश म्हाप्रलकर, जिल्हा युवा अध्यक्ष शरद कुंभार, महिला अध्यक्ष प्रतिभा वाडेकर, सुधागड तालुका अध्यक्ष सोनाली सोनवणे व इतर तालुका आणि जिल्हा पदाधिकारी यांच्या उपस्थित करण्यात आली.

### महानंदा पाटील यांना पुरस्कार



**कळंबोली :** पनवेल तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या घोट प्राथमिक शाळेतील सहाय्यक शिक्षिका महानंदा संजय पाटील यांना महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद समितीच्या वतीने शिक्षण क्षेत्रात केलेल्या मोलाच्या कामगिरीबद्दल राज्यस्तरीय गुरुगौरव पुरस्काराने रोहा येथे मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या वेळी खासदार सुनील तटकरे, समितीचे राज्याचे अध्यक्ष शिवाजी साखरे, राज्य नेते राज्य नेते रामदास ढाकणे, कोकण विभाग प्रमुख प्रसाद म्हात्रे, जिल्हाध्यक्ष अजय कापसे, पत्रकार रिद्धि म्हात्रे तसेच राज्यातील शिक्षक समितीचे शिक्षक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेल-कर्जत प्रवास होणार सुसाट

## रेल्वेच्या दुहेरीकरण प्रकल्पाचे काम युद्धपातळीवर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अडीच हजार कोटी रुपये खर्चाच्या पनवेल-कर्जत उपनगरीय रेल्वेच्या दुहेरीकरण प्रकल्पाचे काम युद्धपातळीवर सुरू असून आतापर्यंत ४७ टक्के मार्गिका पूर्ण झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर रेल्वे बोर्डाच्या इन्फ्रास्ट्रक्चरचे सदस्य रूप नारायण सनकर यांनी शनिवारी (दि. २) पनवेल-कर्जत मार्गाच्या कामाची पाहणी केली. मुंबई रेल्वे विकास महामंडळाचे (एमआरव्हीसी) अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक सुभाषचंद गुप्ता व इतर अधिकारी त्या वेळी उपस्थित होते. डिसेंबर २०२५ पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट एमआरव्हीसीने ठेवले आहे.

पनवेल-कर्जत उपनगरीय मार्गिकेमुळे पनवेलमार्गे सीएसएमटी-कर्जत असा नवा पर्याय उपलब्ध होणार आहे. ते लक्षात घेऊन २०१५च्या रेल्वे अर्थसंकल्पामध्ये तत्कालीन रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांनी पनवेल-कर्जत प्रकल्पास हिरवा कंदील दाखवला. मुंबई रेल्वे विकास महामंडळाच्या माध्यमातून त्यास मंजुरी देण्यात आली. एमआरव्हीसीने मुंबई नागरी परिवहन प्रकल्प ३ (एमयूटीपी ३) अंतर्गत पनवेल ते कर्जत दुहेरी रेल्वे मार्गिका उभारण्याचे काम हाती घेतले आहे. आतापर्यंत ४७ टक्के काम पूर्ण झाले आहे. रूप नारायण सनकर यांनी प्रकल्पाच्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले आहे.

२९.६ किमीच्या पनवेल-कर्जत दुहेरी रेल्वेमार्गावर पनवेल, चौक, मोहापे, चिखले व कर्जत अशी पाच स्थानके आहे. त्याशिवाय फलाट, पादचारी पूल, भुयारी मार्ग इत्यादी कामे होणार आहेत. ३.१२ किमीचे तीन बोगदे असणार आहेत.

मार्गावर दोन रेल्वे उड्डाणपूल, आठ मोठे आणि ३६ लहान पूल असणार आहेत. सर्वांचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. दुहेरी मार्गिकेसाठी दोन हजार ८१२ कोटी रुपये खर्च लागणार आहे.

**भूसंपादनाचा अडथडा दूर**

प्रकल्पासाठी १३५.८९३ हेक्टर जमीन लागणार आहे. आवश्यक असलेल्या सर्व जमिनीचा ताबा रेल्वेला मिळाला आहे. प्रकल्पासाठी ५७.१६ हेक्टर खासगी जमीन संपादित करण्यात आली आहे. ३० मे २०२२ रोजी ९.१३१ हेक्टर वनजमिनीला मंजुरी मिळाली. वनजमिनीत काम करण्याची परवानगी मिळाली असून कामही सुरू झाले आहे.

**तिन्ही बोगद्यांचे काम प्रगतिपथावर**

प्रस्तावित रेल्वेमार्गावर नढाल, किरवली आणि वावर्ले असे तीन बोगदे उभारण्यात येणार आहेत. त्यांपैकी वावर्ले बोगदा २६२५ मीटर लांबीचा आहे. आतापर्यंत २६२५ पैकी १६९१ मीटर जमिनीखाली उत्खनन पूर्ण झाले आहे. पुढील काम प्रगतिपथावर आहे. नढाल बोगद्याची लांबी २१९ मीटर असून आतापर्यंत जमिनीखाली उत्खनन पूर्ण झाले आहे. २१९ पैकी ६८ मीटर आरसीसी अस्तरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. किरवली बोगदा ३०० मीटर लांबीचा आहे. १२२ मीटर जमिनीखालील उत्खनन पूर्ण झाले असून पुढील काम प्रगतिपथावर आहे.

## कोपरखैरणे येथे घरफोडी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

गावाहून आलेल्या आपल्या भावास घरी घेऊन येण्यासाठी बहीण गेली, मात्र घरी येऊन पाहताच दरवाजाचा कडी कोयंडा तोडून चोराने घरात प्रवेश करीत चार लाख ५५ हजार ६४१ रुपयांचा ऐवज चोरी केला होता. याबाबत कोपरखैरणे पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

छाया देसाई या कोपरखैरणे सेक्टर १२ येथे पती, मुलगा आणि सुने समवेत राहतात. पती कुर्ला येथे नोकरी करतात तसेच मुलगा आणि सून दोघेही नोकरी करीत असल्याने दिवसभर छाया घरीच असतात. याच परिसरात त्यांचा भाचा राहतो. ३० तारखेला त्यांचा भाऊ मूळ गावाहून आपल्या मुलाकडे आला. याच भावाला घरी घेऊन येण्यासाठी म्हणून छाया या सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास घराला कुलूप लावून बाहेर पडल्या. तर सहाच्या सुमारास भावाला घेऊन घरी आल्या. त्याच वेळेस दरवाजाचा कडी कोयंडा तुटलेल्या अवस्थेत होता तर आतील सर्व सामान विस्कटलेले होते. तसेच कपाट उघडलेले दिसले.

पाहणी केली असता घरात असलेले मंगळसूत्र, सोन्याचा हार, सोन्याचे पेंडंट, पान, डूल असा एकूण चार लाख ५५ हजार ६४१ रुपयांचा ऐवज चोरी झालेला होता. याबाबत शुक्रवारी कोपरखैरणे पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



## व्याख्याते दिलीप मंडल वाहणार बाबासाहेबांना वैचारिक आदरांजली

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या सदोदित प्रेरणादायी स्मृतींना वैचारिक आदरांजली अर्पण करीत, महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्वसंध्येला रविवारी (दि. ५) 'विचारवेध' या व्याख्यान शृंखलेंतर्गत सायंकाळी ६.३० वा. सुप्रसिद्ध विचारवंत व लेखक दिलीप मंडल यांचे, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर और राष्ट्र निर्माण' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

नागरिकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अर्पण केली जाणारी ही वैचारिक आदरांजली सुप्रसिद्ध व्याख्याते दिलीप मंडल यांच्या तोंडून प्रत्यक्ष अनुभवण्यासाठी रविवारी सायंकाळी ६.३० वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकातील सभागृह, मुलुंड-ऐरोली खाडी पुलाजवळ, सेक्टर १५, ऐरोली, नवी मुंबई येथे आवर्जून उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

याचप्रमाणे ऐरोली, नवी मुंबईतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक हे इतर कोणत्याही स्मारकांपेक्षा अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण व वेगळे असे स्मारक असून या ठिकाणी असलेले ई लायब्ररीसह पुस्तकांनी संपन्न ग्रंथालय, बाबासाहेबांचे दुर्मीळ छायाचित्रातून जीवनदर्शन घडवणारे विशेष दालन, बाबासाहेबांच्या भाषणाचा प्रत्यक्ष अनुभव देणारा होलोग्रफिक प्रेझेंटेशन शो, अभिनव भव्यतम ध्यानकेंद्र या साऱ्या सुविधांचा अनुभव घेत बाबासाहेबांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यासाठी ६ डिसेंबर रोजीही चैत्यभूमीप्रमाणेच ऐरोली येथील स्मारकालाही आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## 'अंनिस'चे सभासद नोंदणी अभियान



**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या, सानपाडा शाखेने सभासद नोंदणी अभियान राबविले. सभासद नोंदणी अभियान रविवारी (दि. ३) सानपाडा सेक्टर ७ मधील कै. सिताराम मास्तर उद्यानाजवळ राबविण्यात आले.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, विवेकी विचारांचा प्रचार व प्रसार करते. जनमानसात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा म्हणून विविध उपक्रम राबवते. ते उपक्रम लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी लोकांचा संपर्क असणे गरजेचे आहे. लोक संपर्क मिळवण्यासाठी व वाढवण्यासाठी सभासद नोंदणी अभियान राबविले.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती समाजात जागृती निर्माण करते व आम्हाला त्याचे कौतुक आहे, अशा प्रतिक्रिया सभासद नोंदणी अभियानात मिळाल्या. व्यापक परिवर्तनवादी काम करणारी संस्था म्हणून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडे बघितले जाते. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कामाचे फलीत म्हणून महाराष्ट्रात, 'जादूटोणा विरोधी कायदा' संमत झाला. नुसता कायदा संमत झाला नाही तर त्याची अंमलबजावणी सुध्दा होत आहे.

विज्ञान, निर्भयता व निती हा महा. अंनिसचा मार्ग आहे. स्वतः विज्ञानाचा मार्ग अवलंबिला कि प्रत्येक घटनेकडे त्या घटनेमागच्या कार्यकारणभावानुसार बघतो. घटनेमागचा कार्यकारणभाव उलगडला कि त्या घटनेची भिती जाते. भिती गेली की निर्भयता येते. निर्भयता आल्यावर माणूस विवेकाने वागतो. म्हणजेच नीतीने वागतो.

परिवर्तन हे नित्य होतच असते. ते परिवर्तन सकारात्मक पध्दतीने स्विकारण्याची मानसिकता वैज्ञानिक दृष्टिकोन देतो, असे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने म्हटले आहे.

## वाहतूक नियमांबाबत रिक्षाचालकांना मार्गदर्शन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईत बेशिस्त रिक्षा चालकांच्या तक्रारीत वाढ होत असल्याने रिक्षाचालकांमध्ये वाहतूक नियमांबाबत जनाजागृती करण्यासाठी वाहतूक पोलिसांनी पुढाकार घेतला आहे. त्यानुसार महापे वाहतूक शाखेच्या वतीने देखील आपल्या हद्दीतील वेगवेगळ्या रिक्षा स्टँडवर जाऊन रिक्षा चालकांमध्ये वाहतूक नियमाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

नवी मुंबईतील रिक्षाचालकांविरुद्ध प्रवाशांच्या तक्रारी वाढल्या आहेत. त्यामुळे रिक्षाचालकांना वाहतुकीची शिस्त लावण्याचा प्रयत्न पोलीस प्रशासन करत आहेत. महापे वाहतूक शाखेच्या वतीने महापे सर्कल रिक्षा स्टँड तसेच इतर स्टँडवर वरिष्ठ पोलिस निरीक्षक बी.एस.सय्यद यांनी स्वत: जाऊन रिक्षा चालकांना वाहतूक नियमांबाबत मार्गदर्शन केले. नो पार्किंगमध्ये रिक्षा उभ्या न करणे, ओवर सीट न बसवणे, रिक्षा चालवताना मोबाईल फोनचा वापर करू नये, मद्यपान करुन रिक्षा चालवू नये, मीटरप्रमाणे भाडे आकारणे, स्वच्छ युनिफॉर्म परिधान करणे, भाडे नाकारू नये, रिक्षाची कागदपत्रे अद्ययावत ठेवणे, प्रवाशांबरोबर सौजन्याने वागावे, याबाबत रिक्षा चालकांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल, अशी सूचनाही रिक्षाचालकांना देण्यात आली.

## अग्रहरी समाजातर्फे दिवाळी मिलन कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

अग्रहरी समाज विकास सेवा संस्था मुंबई नवी मुंबईच्या वतीने शुक्रवारी (दि. १) नेरूळ येथील विशियस हॉटेलमध्ये नुकतेच दिवाळी मिलन मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमात मुंबईत राहणाऱ्या सर्व अग्रहारी समाजातील लोक सहभागी झाले होते. या कार्यक्रमात समाजाच्या विविध प्रश्नांवर अर्थपूर्ण चर्चा करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने आपल्या अग्रहरी समाजाला शासकीय योजनांचा लाभ कसा मिळू शकतो याची माहिती देण्यात आली आणि मुंबई, नवी मुंबई आमच्या संस्थेतर्फे मुंबईतील अशासकीय रुग्णालयात उपचारात सुमारे २० टक्के सवलत मिळत आहे, ज्याची माहिती समाजातील लोकांना तसेच विविध भागात राहणाऱ्या अग्रहरी समाजाला सामाजिक ऐक्य व एकोपा या उद्देशाने देण्यात आली. समाजाला जोडा, समाजातील संघटनांना आपापल्या भागात संघटित करून त्यांना सर्वतोपरी मदत करणे आणि विवाह इत्यादीमधील अनावश्यक खर्च थांबवणे यावर सविस्तर चर्चा झाली, याला सर्वांनी पाठिंबा दिला.

नवी मुंबई व मुंबई येथे अग्रहरी समाजातील विविध कलागुणांचा गौरव करण्यात आला, यामध्ये औद्योगी, वैद्यकीय, क्रीडा आणि शैक्षणिक, वकील क्षेत्रात चमकदार कामगिरी करणाऱ्या प्रतिभावंतांचा गौरव करण्यात आला, डॉ. कांचन वैश्य, ज्यांनी यावर्षी डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेजमध्ये एमडी पूर्ण केले. त्यांचा सन्मान करण्यात आला. यासोबतच यावर्षी एमबीबीएस पूर्ण केलेले डॉ. शुभम गुप्ता व बॉडी बिल्डिंगमध्ये मुंबई श्री हा किताब पटकावणारे हर्ष अग्रहरी यांचा सन्मान करण्यात आला. आरुष गुप्ता याने १० वीच्या परीक्षेत चमकदार कामगिरी करून आपल्या पालकांचा आणि शिक्षकांचा गौरव केला आणि त्याचाही सन्मान करण्यात आला.

## राज्य नाट्य स्पर्धेत 'ऑफ कोर्स' होणार सादर

**उरण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनातर्फे आयोजित ६२ करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य हौशी स्पर्धेला उरण तालुक्यातील नाट्य कलेचा वारसा असलेल्या चिरनेर गावचे भूमिपुत्र मनोहर फुंडेकर यांनी लिहिलेल्या रंगसेवा निर्मित केलेल्या ऑफकोर्स नाट्य कलाकृतीचे या स्पर्धेसाठी सादरीकरण होणार आहे.

२८ डिसेंबर २०२३ ते ४ जानेवारी २०२४ या दरम्यान मोठ्या उत्साहात ही स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेमध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून एकूण ५८० संघाचा सहभाग असून ठाणे, पालघर, रायगड जिल्हयातील संघही या स्पर्धेत सहभागी झाले असून ठाणे येथे डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात या जिल्ह्यासाठी होणार आहेत.

या वर्षीच्या २०२३ च्या राज्यस्तरीय नाट्य स्पर्धेत मनोहर फुंडेकर यांच्या 'ऑफ कोर्स' या रहस्यमयी कॉमेडी नाटकाचा सहभाग आहे. या नाटकाचे दिग्दर्शन प्रसिद्ध नाट्य दिग्दर्शक किशोर म्हात्रे यांनी केली आहे. संगीताची धुरा विक्रांत वार्डे यांनी सांभाळली असून नेपथ्य रमेश झोरे यांचे आहे. या नाटकाला शुभम नारंगीकर यांची प्रकाश योजना आहे. या नाटकात गौरांगी शेवडे-पाटील, ऋषीकेश पाटील, अश्रिता बारसे, निखिल पाटील, सुजित पाटील आदी कलाकारांच्या समावेश आहे. हे एक व्यावसायिक नाटक आहे. स्पर्धेसाठी या नाटकाचा प्रारंभिक फेरीचा प्रयोग ठाणे येथे डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृहात दिनांक २८ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता आहे, परंतु या नाटकाचा पहिला प्रयोग पनवेल येथे वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात दिनांक ४ डिसेंबर २०२३ रोजी सायंकाळी ८ वाजता पहिला प्रयोग विनामूल्य होणार आहे.

आता पर्यंत मनोहर फुंडेकर यांची मर्यादा, मी फुलराणी, योग तुझा घडावा, आम्ही सगळे शहाणे ई. नाटके व्यावसायिक तसेच प्रायोगिक रंगभूमीवर झळकली आहेत. तसेच आर्यारवी एन्टरटेन्मेंट ने आयोजित केलेल्या २०२२ च्या लघुचित्रपट स्पर्धेत त्यांच्या 'चावी द की' या लघु चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. या आगरी लेखकाच्या या लेखनामुळे त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी चित्रपटाचा मोफत शो

**नवी मुंबई : बातमीदार**

विद्यार्थ्यांसाठी प्रेरक असलेल्या १२वी फेल या चित्रपटाचे सर्वत्र आकर्षण आहे. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारा, त्यांचे मनोबल उंचावणारा हा चित्रपट असल्याने विद्यार्थ्यांच्या मनात या चित्रपटाबद्दल प्रचंड आकर्षण आहे. या चित्रपटातून खचून न जाण्याचा संदेश दिला जात असून, या चित्रपटाचे मोफत शोचे आयोजन भाजप कार्यकर्ते दत्ता घंगाळे यांनी केले होते. धर्मवीर संभाजीराजे चॅरिटेबल ट्रस्टतर्फे सीवूड-करावेनगर विभागातील आठवी ते बारावी इयत्तेच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केला होता. त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



सत्य घटनेवर आधारित १२वी फेल या सिनेमाचा मोफत शो सीवूड ग्रँड सेंट्रल मॉल येथील सिनेपोलीस सिनेमागृहात आयोजीत केला होता. विध्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने प्रतिसाद दिला. अत्यंत प्रतिकूल परिस्थिती मद्धे एखादा युवक कुटूंबाची जबाबदारी स्वीकारून, शिक्षण घेतो, आणि जे स्वप्न पहिले आहे ते प्रत्यक्षात आणतो. प्रामाणिकपणा हा गाभा ठेवून मार्गक्रमण करतो. हार नहीं मानूंगा राह नहीं ठानूंगा या अटलजी यांच्या कवितेच्या ओळी या सिनेमामध्ये मार्गदर्शक ठरतात. हे सर्व विभागातील युवक-युवतीना दाखविण्याचा ट्रस्टचा उद्देश या निमित्ताने सफल झाला तसेच भविष्यात अशा पद्धतीने मार्गक्रमण यश संपादन करणाऱ्या विभागातील विद्यार्थ्यांला उत्तेजनार्थ म्हणून ट्रस्टच्या वतीने एक लाख अकरा हजार रुपयांचे पारितोषिक जाहीर करण्यात आले, अशी माहिती आयोजक तथा ट्रस्टचे अध्यक्ष दत्ता घंगाळे यांनी दिली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजमाता जिजाऊ महिला मंडळाच्या अध्यक्षा अश्विनी दत्ता घंगाळे, ट्रस्टचे सदस्य पंकज पाचपुते, नरेंद्र जुराणी, सुधीर जाधव, विकास नलावडे, प्रसाद ठाकूर, सुरेशकुमार, नवनाथ मोठे, राजेंद्र कांबळे यांनी विशेष मेहनत घेतली.

## दिव्यांग दिनानिमित्त आदिवासी आश्रमशाळेत दप्तराचे वाटप

**पनवेल, नवी मुंबई : बातमीदार**

आरिन फाऊंडेशन नवी मुंबई वतीने जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य मागील वर्षीप्रमाणे या द्वितीय वर्षी जागतिक अपंग दिनानिमित्त शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा चिंबीपाडा भिवंडी या आदिवासी विभागाची आश्रम शाळेतील पहिली ते दहावी विद्यार्थ्यांना १५० शैक्षणिक वापरात येणाऱ्या स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले.

या वेळी आश्रम शाळेचे अधिक्षक महादेव भंडारे, स्त्री अधिक्षीका माधुरी लोखंडे आणि संस्थेचे प्रकल्प अधिकारी व व्यवस्थापक किरण जाधव, सामाजिक कार्यकर्ते किरण शेडगे, संज्योग येरूनकर, चंद्रशेखर हेंडवे आणि शाळेचे कर्मचारी सुभाष देवकाते, रवींद्र पवार, उपस्थित होते.



संस्थेच्या वतीने जागतिक अपंग दिनाची माहिती देत संस्थेच्या पुढील वाटचालीची माहिती देण्यात आली. तसेच तर दहावी बारावी जे विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होतात, त्यांना पुढील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येते, त्यामुळे विध्यार्थीना प्रोत्साहन देण्यात आले, तर विधवा महिला, यांनाही टेलरिंग, पार्लर विविध अश्या विविध प्रशिक्षण देऊन महिला सक्षमीकरण करण्यात येत असल्याची माहिती या वेळी देण्यात आली असून या संस्थेकडून पुढील काळात ही कार्यरत राहील, असे आश्वासन देऊन विद्यार्थ्यांना आनंद देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## निवडक



### नागोठण्यात भाजपच्या विजयाचा जल्लोष

**नागोठणे :** मध्यप्रदेश, राजस्थान व छत्तीसगडमधील विधानसभा निवडणुकीमध्ये भाजपने मिळविलेल्या महाविजयाचा रविवारी (दि. ३) नागोठणे शहर भाजपच्या कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात फटाक्यांच्या अतिषबाजीत जल्लोष साजरा केला. या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पक्षाच्या विजयाच्या घोषणांनी छत्रपती शिवाजी महाराज चौक दाणाणून गेला होता. भाजप नेते किशोर म्हात्रे, एकनाथ ठाकुर, आनंद लाड, मोरेश्वर म्हात्रे, अशोक अहिरे, रऊफ कडवेकर, धनराज उमाळे, अंकुश सुटे, शेखर गोळे, तिरथ पोलसानी, राजन दुबे, विठोबा माळी, विहार हेंडे आदींसह कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.

### आदिवासी, दिव्यांग बांधवांना पोषाख



**नागोठणे :** विद्यार्थी उन्नती संघ नागोठणे आणि प्रज्योती पुस्तकपेढी, जोगेश्वरी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. ३) जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून सुधागड तालुक्यातील उद्धर व शिरसे आदिवासीवाडी येथील आदिवासी आणि दिव्यांग बांधवांना पोषाख वाटप करण्यात आले. या वेळी माजी अध्यक्ष कांचन वाडेकर, राजेश सावंत, अजय शिगवण, दिनेश चव्हाण, संघाचे विद्यमान अध्यक्ष, दीपक वाडेकर, सचिव रोहिदास हातनोलकर, खजिनदार सचिन वासकर, अनिल नागोठणेकर, मिलिंद धाटावकर, आनंद धाटावकर, दिपक नागोठणेकर, मंगेश नागोठणेकर, शैलेश नागोठणेकर, रायगड जिल्हा कुंभार समाज महिला अध्यक्ष प्रतिभा दिपक वाडेकर, राहूल नागोठणेकर, अरूण शिंदे, लक्ष्मण शिंदे व ग्रामस्थ उपस्थित होते.

### माथेरानमध्ये दिव्यांग बांधवांचा सन्मान

**माथेरान :** जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून माथेरानमधील दिव्यांग बांधवांचा माथेरान मानव कल्याण दिव्यांग सामाजिक संस्थेच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. या वेळी संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत जाधव, मुंबईतील दानशूर व्यक्तिमत्त्व असलेले अमूदोन तमील, माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, क्षत्रिय मराठा समाज महिला अध्यक्ष प्रतिभा घावरे, माजी नगरसेवक प्रकाश सुतार, दिनेश सुतार आदी उपस्थित होते. येथील शास्त्री हॉलच्या प्रांगणात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी आकाश चौधरी, प्रतिभा घावरे, प्रकाश सुतार, दिनेश सुतार यांनी आपले विचार व्यक्त केले.



# फोर्टिफाईड तांदळाबाबत लाभार्थी अनभिज्ञ

## प्लास्टिक तांदूळ असल्याचा संशय; जनजागृतीची गरज

**पाली : प्रतिनिधी**

कुपोषणावर मात करण्यासाठी शासन विविध योजना राबविते. रेशन दुकानातून लाभार्थ्यांना दिला जाणारा फोर्टिफाईड तांदूळ हादेखील कुपोषणावर मात करण्याचा एक उपाय आहे. दररोजच्या तांदळापेक्षा वेगळा दिसत असल्याने तो प्लास्टिक तांदूळ असल्याचा नागरिकांना संशय आहे. त्यामुळे हा तांदूळ नागरिक फेकून देत आहेत. याबाबत जनजागृती करणे गरजेचे बनले आहे.

रेशन दुकानात प्लास्टिक तांदूळ मिळत असल्याच्या तक्रारी येत असल्याने तहसीलदारांनी, हा फोर्टिफाईड तांदूळ असून या तांदुळाबाबत जनजागृती करणे व लाभार्थ्यांना माहिती देण्याबाबत सूचना दिल्या असल्याचे सांगितले.

फोर्टिफाईड तांदळात पोषकतत्त्वे व खनिजांची मात्रा मिसळलेली असते. प्रथम तांदूळाची भुकटी तयार केली जाते व त्यात हे सर्व मिसळले जाते. या मिश्रणाला पुन्हा तांदुळाचा आकार दिला जातो. यालाच फोर्टिफाईड तांदूळ म्हणतात. हा तांदूळ १०० किलोमध्ये एक किलो मिसळून वितरित केला जातो.



**फोर्टिफाईड तांदळात काय आहे?**

**लोहखनिज – अशक्तपणा व तांबड्या पेशींची कमतरता दूर करते**

**फॉलिक ॲसिड – गर्भाचा विकास व नवीन पेशी बनविते**

**विटामिन बी १२ – मज्जासंस्थेचे कार्य सुरळीत सुरू ठेवते**

**रेशनदुकानदारांची भूमिका व जबाबदारी**

फोर्टिफाईड तांदळाची गुणवत्ता, चव व आरोग्यासाठी असणारे लाभ तसेच प्रत्येक लाभार्थ्याला या तांदळाचा नमुना दाखविणे.

या तांदळाचा लाभ होण्यासाठी भात शिजवताना योग्य प्रमाणात पाणी टाकावे व उरलेले पाणी फेकून देऊ नये हे प्रत्येक लाभार्थ्याला समजावून सांगणे.

# माथेरानमध्ये भाजपच्या विजयाचा आनंदोत्सव



**माथेरान : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणुकीत मध्य प्रदेश, राजस्थान व छत्तीसगड या तीन राज्यात भाजपने मोठे यश संपादन केल्याने माथेरान शहरात जल्लोष करण्यात आला.

लोकसभेची सेमी फायनल म्हणून या राज्यातील निवडणुकांकडे पाहिले जात होते. रविवारी सकाळी निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यावर भाजपने मध्य प्रदेश, राजस्थान व छत्तीसगड या तीन राज्यात मोठे यश संपादन केले. या विजयानंतर माथेरानमधील भाजप कार्यकर्त्यांनी मुख्य बाजारपेठेतील श्रीराम चौकात एकत्रित येऊन सर्वांना शुभेच्छा देत आनंदोत्सव साजरा केला. भाजपचा 'सब का साथ, सब का विकास' हा नारा आहे. केंद्र सरकारतर्फे विविध लोककल्याणकारी योजना राबविल्या जात आहेत. भारतीय जनता पक्षाने जनतेच्या मनात विश्वासार्हता निर्माण केली असून त्याचेच प्रतिबिंब निवडणूक निकालातून उमटल्याची प्रतिक्रिया शहर अध्यक्ष प्रवीण सकपाळ यांनी दिली.

या वेळी उपाध्यक्ष किरण चौधरी, माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, माजी नगरसेवक चंद्रकांत जाधव, माथेरान व्यापारी फेडरेशनचे अध्यक्ष राजेश चौधरी, माजी शहर अध्यक्ष विलास पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ते अरविंद शेलार, शैलेंद्र दळवी, महिला कार्यकर्त्या संध्या शेलार, सुहासिनी शिंदे, गीता जाधव, मेघा कोतवाल, माजी नगरसेविका लक्ष्मी चौधरी, जनार्दन पार्टे, सुभाष भोसले, बाबू बर्गे, विजय चौधरी, संजय भोसले, युवा अध्यक्ष संतोष शेलार, संतोष आखाडे आदी उपस्थित होते.

सशस्त्र सेना झेंडा दिवस



## सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन शुभारंभ

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्याचा सशस्त्र सेना ध्वजदिन २०२३ निधी संकलन शुभारंभ कार्यक्रमाचे गुरुवारी (दि. ७) सकाळी ११. वा. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल राहुल वैजनाथ माने (निवृत्त) यांनी दिली आहे.

या कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व कार्यालये/संस्थांचे प्रमुख, कर्मचारी व नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहनही ले. कर्नल राहुल वैजनाथ माने यांनी केले आहे.

## उंबरे येथील पुलावर खड्डा; अपघाताची शक्यता

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली-पाली राज्यमार्गावर उंबरे गावाच्या हद्दीत पुलावर पडलेला खड्डा चुकवताना अपघात होण्याची दाट शक्यता वाहनचालकांनी वर्तवली आहे.

पाली-खोपोली राज्यमार्गाचे काँक्रिटीकरण आणि दुपदरीकरणाचे काम खालापूर हद्दीत अंतिम टप्प्यात आहे. दुपदरीकरण करताना काही ठिकाणी नव्याने मोरी, पुलाचे काम करण्यात आले आहे. खालापूर हद्दीत उंबरे गावाचे हद्दीत नव्याने पूल बांधण्यात आला आहे. या पुलावर खोपोलीच्या दिशेने येताना मोठा खड्डा पडला आहे. उताराचा आणि वळणाचा भाग असल्याने वाहनचालकांना खड्ड्याचा अंदाज येत नाही. वेगाने येणारी वाहन खड्ड्यात आपटून अनेकदा वाहनावरील नियंत्रण सुटते, तर काही वाहनचालक खड्डा चुकविण्यासाठी समोरील येणाऱ्या वाहनाच्या दिशेने जात असल्याने अपघाताची दाट शक्यता आहे.

त्यामुळे या रस्त्याची लवकरात लवकर दुरुस्ती करावी, अशी मागणी माहिती अधिकार कार्यकर्ता प्रशांत पाटील यांनी केली आहे.



# खोपोलीत ज्येष्ठ नागरिकांसमवेत देव दिवाळी उत्साहात



**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर प्रेस क्लबने सालाबादप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांबरोबर फराळ खाऊन, फटाके फोडत देव दिवाळी साजरी केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष प्रशांत गोपाळे यांनी केले. कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर, खोपोली पोलीस निरीक्षक शीतल राऊत, सकल मराठा राज्य समन्वयक व माजी नगराध्यक्ष डॉ. सुनील पाटील, माजी नगरसेवक अमोल जाधव, ज्येष्ठ नागरिक सभेचे माजी अध्यक्ष एन. बी. पाटील, विद्यमान अध्यक्ष चौधरी, अल्ट्रा कंपनीचे व्यवस्थापक प्रधान उपस्थित होते. पोलीस निरीक्षक शीतल राऊत यांनी, ज्येष्ठ नागरिकांच्या मदतीसाठी पोलीस २४ तास उपलब्ध असतील, असा विश्वास दिला.


**नमुना एन. डी.**

(नियम ९२(३) पहा)

परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH/46/CC/Auto/2018/2149 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH46 AZ 5161 चे मालक **माया गोविंद पाटील** यांचे तारीख २५/१०/२०२३ रोजी निधन झालेले आहे.

मी **मनिषा माया पाटील,** पत्ता : रा. ६५९, बेलवली, चिखले ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२२१ (महाराष्ट्र) उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेलच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव – मनिषा माया पाटील,**
पत्ता : रा. ६५९, बेलवली, चिखले
ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२२१ (महाराष्ट्र)


# माणगाव भाजप युवा मोर्चा तालुकाध्यक्षपदी परेश सांगले

**माणगाव : प्रतिनिधी**

भाजपच्या युवा मोर्चा माणगाव तालुका अध्यक्षपदी युवा उद्योजक परेश सुरेश सांगले यांची नियुक्ती युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांनी केल्याचे जाहीर केले आहे.

परेश सांगले यांनी भाजपमध्ये प्रवेश करताच माणगाव तालुक्यातील तरुणांना संघटित करीत तरुणांची फळी पक्षामागे उभी करण्याची सुरुवात केली. पानसईसारख्या ग्रामीण गावातून असल्यामुळे त्यांचा ग्रामीण भागातील तरुणांशी अतिशय चांगला संपर्क आहे.



पक्षकार्यासाठी कोणतीही अपेक्षा न ठेवता समर्पित भावाने कार्य करण्याची त्यांची क्षमता पाहूनच वरिष्ठांनी त्यांची नियुक्ती केलेली आहे. त्यांच्या निवडीबद्दल तालुक्यातील सर्वच स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर, लोकसभा प्रमुख सतीश धारप, दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांना अभिप्रेत असणारे कार्य त्यांच्या हातून घडेल, अशी अपेक्षा भाजप युवानेते निलेश थोरे यांनी व्यक्त केली.

# कर्जत महोत्सवाचा शानदार शुभारंभ



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतमधील संकल्प सामाजिक संस्था व भारतीय जनता पक्ष यांच्या वतीने दहा दिवस कर्जत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचा शुभारंभ रविवारी (दि. ३) करण्यात आला.

पोलीस मैदानावर महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. संकल्प सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुनील गोगटे यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून महोत्सवाचा शुभारंभ करण्यात आला. या वेळी उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, भाजप जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, चिटणीस रमेश मुंढे, किसन सेल जिल्हाध्यक्ष अतुल बडगुजर, तालुकाध्यक्ष राजेश भगत, शहराध्यक्ष विजय जिनगरे, महिला मोर्चा शहराध्यक्ष शर्वरी कांबळे, महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष स्नेहा गोगटे, शहर युवा मोर्चा अध्यक्ष दर्वेश गोगटे, शहर सरचिटणीस सूर्यकांत गुप्ता, दिनेश सोलंकी, किशोर वैद्य आदी उपस्थित होते.

या वेळी बोलताना दीपक बेहेरे यांनी, कर्जत महोत्सवाच्या निमित्ताने कर्जतकरांना करमणुकीचा आनंद घेता येणार आहे, असे स्पष्ट केले. सुनील गोगटे यांनी, आपण २००४पासून कर्जत महोत्सव करीत आहोत. आज आपण १९व्या वर्षीदेखील विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन आपण करीत आहोत, असे स्पष्ट केले. राजेश भगत आणि रमेश मुंढे यांनीही मनोगत व्यक्त केले. त्यानंतर युसुफ खान, हमीद खैरात आणि स्नेहा गोगटे यांनी हिंदी गीते सादर करून रंगत आणली.


**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत,कै. नामदेव गणपत भोईर मयत तर्फे वारस,१) श्रीमती कमलाबाई नामदेव भोईर, २) श्री. विजय नामदेव भोईर, ३) श्री. जयवंत नामदेव भोईर, ४) श्री. हरिश्चंद्र नामदेव भोईर, ५) श्रीमती रंजना चंद्रकांत म्हसकर, ६) श्रीमती सुवर्ण गोपीनाथ मढवी , यांच्या नावे अधिकार अभिलेखी नमूद असलेल्या भोगवटाधारकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. जिचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टामध्ये केलेले असून, यापुढे या जमिनीस संक्षिप्तपणे 'सदरहूमिळकत' असे उल्लेखलीले आहे. मिळकतीचे वर्णन

**मौजे नितळस ता. पनवेल. जिल्हा रायगड**

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ३६ | ० | ०-९३-१०<br>पो.ख. ०-०२-५०<br>**एकूण ०-९५-६०**<br>पैकी ०-६०-०० इतके क्षेत्र | ४.६९ |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचाहक्क, हितसंबंध व अधिकार,ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार,विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत,खाली सही करणार,खरेदीदारांचे वकीलयांच्या खालील पत्त्यावर प्रथम दर्शनी पुराव्यासह,लेखीहरकतीरजिस्टड पोस्टाने दाखल कराव्यात.याप्रमाणे, मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे, असे समजून आमचे अशील सदर मिळकती संदर्भातील सर्वव्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

सही /-

दिनांक : ०५/१२/२०२३ **ॲड. वृषाली नायर (पाटील),**

१६, दूरवाणी सी.एच.एस., सेक्टर ६, सीबीडी बेलापूर
नवी मुंबई ४००६१४. मोबाईल नं.९१३७१३३९१८


# लोकनेते अशोकदादा साबळे बालोद्यानाचे लोकार्पण

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायतीच्या सहकार्याने आणि पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीच्या सीएसआर उपक्रमांतर्गत तलाठी भवन कार्यालयाजवळ लोकनेते अशोकदादा साबळे बालोद्यान साकारण्यात आले आहे. त्याचे लोकार्पण सोमवारी (दि. ४) राजिपचे माजी शिक्षण व आरोग्य समिती सभापती ॲड. राजीव साबळे यांच्या हस्ते करण्यात आले.

या बालोद्यानाचे नूतनीकरण काही महिन्यांपूर्वी नगरपंचायतीच्या सहकार्याने आणि पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीच्या सीएसआर उपक्रमांतर्गत करण्यात आले. या बालोद्यानाचे लोकार्पण सोमवारी करण्यात आले. या बालोद्यानात लहान मुलांसाठी वेगवेगळी खेळणी असून याठिकाणी लहान मुले मनमुराद आनंद लुटत आहेत.



या वेळी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, उपनगराध्यक्ष राजेश मेहता, माजी उपनगराध्यक्ष सचिन बोंबले, नगरपंचायतीचे पाणीपुरवठा सभापती कपिल गायकवाड, स्वच्छता सभापती दिनेश रातवडकर, माजी स्वच्छता सभापती तथा विद्यमान नगरसेवक अजित तारलेकर, मुख्याधिकारी संतोष माळी, माजी स्वीकृत नगरसेवक नितीन बामगुडे, भाजपचे शहराध्यक्ष नितीन दसवते, प्रसाद धारिया, सुनील पवार, विरेश येरुणकर, सुधाकर शिपूरकर व गणेश वागरे, इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका मनीषा मोरे, नगरपंचायतीचे कर्मचारी, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# भारताचा ऑस्ट्रेलियावर रोमहर्षक विजय

## टी-२० मालिका ४-१ने जिंकली

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर रविवारी झालेल्या शेवटच्या टी-२० सामन्यात भारताने ऑस्ट्रेलिया सहा धावांनी पराभव केला. त्याचबरोबर पाच सामन्यांची टी-२० मालिका ४-१ अशी जिंकली आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मॅथ्यू वेडने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर भारताने २० षटकांत आठ विकेट गमावत १६० धावा केल्या. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाला २० षटकांत आठ गडी गमावून केवळ १५४ धावा करता आल्या.




अर्शदीप सिंगने अप्रतिम गोलंदाजी करीत शेवटच्या षटकात १० धावा वाचवल्या. त्याने भारतीय संघाला सहा धावांनी विजय मिळवून दिला. अर्शदीपने २०व्या षटकात ऑस्ट्रेलियन कर्णधार मॅथ्यू वेडला बाद करून भारताचा विजय निश्चित केला होता. त्याने पहिल्या आणि दुसऱ्या चेंडूवर वेडला धावा काढू दिल्या नाहीत. तिसऱ्या चेंडूवर वेड बाद झाला. जेसन बेहरेनडॉर्फ चौथ्या चेंडूवर केवळ एक धाव काढू शकला. आता ऑस्ट्रेलियाला दोन चेंडूंत नऊ धावा करायच्या होत्या. पाचव्या चेंडूवर नॅथन एलिसने धाव घेतली. त्याच्यापाठोपाठ बेहरेनडॉर्फनेही शेवटच्या चेंडूवर एकच धाव घेतली. अशा प्रकारे टीम इंडियाने सहा धावांनी सामना जिंकला.

ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मॅथ्यू वेडने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. त्यामुळे भारताने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत आठ विकेट गमावत १६० धावा केल्या. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाला २० षटकांत आठ गडी गमावून केवळ १५४ धावा करता आल्या. ऑस्ट्रेलियाकडून बेन मॅकडरमॉटने सर्वाधिक ५४ धावा केल्या, मात्र तो संघाला विजयापर्यंत नेऊ शकला नाही. ट्रॅव्हिस हेडने २८ आणि मॅथ्यू वेडने २२ धावा केल्या. या तिघांशिवाय इतर कोणत्याही फलंदाजाला २० धावांचा पल्ला गाठता आला नाही. टीम डेव्हिड १७ धावा करून बाद झाला, तर मॅथ्यू शॉर्ट १६ धावा करून बाद झाला. ॲरॉन हार्डीला सहा आणि जोश फिलिपला चार धावांवर बाद झाला. भारताकडून मुकेश कुमारने शानदार गोलंदाजी करताना सर्वाधिक तीन बळी घेतले. अर्शदीप सिंग आणि रवी बिश्नोई यांना प्रत्येकी दोन विकेट मिळाल्या, तर अक्षर पटेलने एक विकेट घेतली.

तत्पूर्वी श्रेयस अय्यरने आपल्या टी-२० कारकिर्दीतील आठवे अर्धशतक झळकावून भारताला ऑस्ट्रेलियाविरुद्ध सन्मानजनक धावसंख्येपर्यंत नेले. अय्यरने संघाकडून सर्वाधिक ५३ धावा केल्या. त्याने ३७ चेंडूंच्या खेळीत पाच चौकार आणि दोन षटकार मारले. अक्षर पटेलने २१ चेंडूंत ३१ धावा केल्या. जितेश शर्माने १६ चेंडूंत २४ आणि यशस्वी जैस्वालने १५ चेंडूंत २१ धावा केल्या. ऋतुराज गायकवाड १० आणि रिंकू सिंग सहा धावा करून बाद झाला. सूर्यकुमार यादव पाच धावा करून आणि रवी बिश्नोई दोन धावा करून बाद झाले. दोन धावा केल्यानंतर अर्शदीप नाबाद राहिला. ऑस्ट्रेलियाकडून जेसन बेहरेनडॉर्फ आणि बेन डोर्सिसने प्रत्येकी दोन गडी बाद केले. ॲरॉन हार्डी, नॅथन एलिस आणि तन्वीर संघाला प्रत्येकी एक विकेट मिळाली.

# नवोदित मुंबई श्री स्पर्धेत अक्षय गवानेला सुवर्णपदक

**पाली : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील शरीरसौष्ठवपटू अक्षय अशोक गवाने याने नुकतेच मुंबई मालाड येथे आयोजित नवोदित मुंबई श्री स्पर्धेत ५५ वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. यासह त्यराने वडील व बहिणीचे स्वप्न पूर्ण केले.

माणगावमधील कोल्हाण येथील मूळचा अक्षय गवाने याने खेडेगावात राहून उच्च शिक्षण पूर्ण केले आणि नोकरीच्या शोधात तो मुंबईकडे गेला. तेथे त्याला जिमची आवड निर्माण झाली. त्याला प्रशिक्षक सुनील गावडे यांनी शरीरसौष्ठव स्पर्धेचे प्रशिक्षण दिले. त्यानंतर अक्षयने पालघर श्री, वसई श्री स्पर्धेमध्ये सहभाग घेतला. २०१९ साली माणगावमध्ये झालेल्या माणगाव श्री स्पर्धेत अक्षयने सुवर्ण पदक पटकावले. त्याचा खरा प्रवास येथून सुरू झाला. त्यात वडिलांचे स्वप्न होते की, तू आता मोठ्या स्पर्धेसाठी तयारी कर आणि यश खेचून आण. मग अक्षयने आपली कसरत चालू ठेवली. २०२०मध्ये वडिलांचे हृदयविकाराने निधन झाले. अशा वेळी बहीण अर्चना हिने अक्षयला धीर व साथ देऊन पुढील वाटचालीत त्याच्या कायम सोबत राहिली.

अक्षयने काही वर्ष गावाला राहून इंदापूर येथे जिममध्ये प्रशिक्षण घेतले. रायगड श्री २०२२मध्ये अक्षयने सुवर्णपदक पटकावल्यानंतर कोर्स पूर्ण करण्यासाठी त्याचा मुंबई, पुणे असा प्रवास सुरू झाला. विविध कोर्स पूर्ण झाल्यानंतर तो मुंबई येथे मोठ्या जिममध्ये पर्सनल ट्रेनर म्हणून काम करू लागला. दरम्यान त्याला आपले घर व मोठ्या स्पर्धेची तयारी करण्यासाठी येणारा खर्च खूप भरमसाठ होता, परंतु अक्षयला बहिणीने साथ दिली. अक्षयने नवोदित मुंबई श्री स्पर्धेत भाग घेऊन ५५ वजनी गटात सुवर्णपदक पटकावले आणि आपल्या वडिलांचे व बहिणीचे स्वप्न पूर्ण केले. याबद्दल त्याचे कौतुक होत आहे.



# नागोठणे कबड्डी असोसिएशनच्या अध्यक्षपदी हनुमान जोशी

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे कबड्डी असोसिएशनच्या वार्षिक सभेत नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यामध्ये पाटणसई येथील सामाजिक कार्यकर्ते हनुमान जोशी यांची एकमताने अध्यक्षपदी निवड करण्यात आली.



उपाध्यक्षपदी मिलिंद डाकी, कार्याध्यक्षपदी गणपत म्हात्रे, कार्यवाहकपदी प्रमोद जांबेकर, सचिवपदी राजेश कामथे, खजिनदारपदी राजेश सुर्वे यांची निवड झाली. या सभेस जय भवानी कुहीरे, जाखमाता वेलशेत, गावदेवी कोंडगाव, बापदेव वणी, चौंडेश्वरी माता वरवठणे, आकादेवी शेतपळस, सिद्धिविनायक आंबेघर, वरदायनी कोंडगाव, जोगेश्वरी नागोठणे, गावदेवी पाटणसई हे संघ उपस्थित होते.

दरम्यान, ही निवड एक वर्षासाठी झाली असून असोसिएशनच्या माध्यमातून खेळविले जाणारे सामने रायगड जिल्हा असोसिएशनला संलग्न असल्याची माहिती असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष पंकज जवके यांनी दिली.

# ऋतुराजने मोडला गप्टिलचा विक्रम

## टी-२० द्विपक्षीय मालिकेत भारतासाठी सर्वाधिक धावा

**मुंबई : प्रतिनिधी**

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील शेवटच्या सामन्यात भारतीय संघाने सहा धावांनी रोमहर्षक विजय मिळवला. त्याचबरोबर ४-१ अशा फरकाने मालिका आपल्या नावावर केली. या सामन्यात सलामीवीर फलंदाज ऋतुराज गायकवाडला मोठी खेळी खेळण्यात यश आले नाही आणि तो केवळ १० धावा करून बाद झाला. तरीही आधीच्या सामन्यांतील धावांमुळे तो ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेत सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत पहिल्या क्रमांकावर पोहचला आहे.



ऋतुराजने या मालिकेत कांगारू संघाविरुद्ध पाच सामन्यांत २२३ धावा केल्या आणि मार्टिन गप्टिलला मागे टाकले. याआधी गुप्टिलने २०२१मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-२० मालिकेत एकूण २१८ धावा केल्या होत्या. या यादीत विराट कोहली १९९ धावांसह तिसऱ्या स्थानावर आहे.

ऋतुराजने टी-२० द्विपक्षीय मालिकेत भारतासाठी सर्वाधिक धावा करणाऱ्या यादीत आपले नाव कोरले. इंग्लंडविरुद्ध विराट कोहली २३१ धावांसह अव्वल स्थानावर आहे. न्यूझीलंडविरुद्ध २२४ धावांसह केएल राहुल या यादीत दुसऱ्या स्थानावर आहे. इशान किशन (२०६ धावा) आणि श्रेयस अय्यर (२०४ धावा) यांचाही यादीत समावेश आहे.

### इशान किशनच्या विक्रमाशी बरोबरी

ऋतुराज गायकवाडने या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत ऑस्ट्रेलियन संघाविरुद्ध एकूण २१ चौकार मारले आणि त्याने इशान किशनच्या विक्रमाशी बरोबरी केली. यापूर्वी भारताकडून कोणत्याही द्विपक्षीय टी-२० मालिकेत सर्वाधिक चौकार मारण्याचा विक्रम इशानच्या नावावर होता, ज्याने २०२२ साली दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत २१ चौकार मारले होते. यानंतर विराट कोहली, श्रेयस अय्यर आणि सूर्यकुमार यादव प्रत्येकी २० चौकार मारून तिसऱ्या स्थानी आहेत.

# जोफ्रा आर्चर २०२४च्या आयपीएलपासून राहणार दूर



**लंडन : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमिअर लीग २०२४साठी होणाऱ्या लिलावापूर्वी १० फ्रँचायझींनी करारमुक्त केलेल्या खेळाडूंची नावे जाहीर केली. मुंबई इंडियन्सने मागील दोन वर्ष केवळ संघात कायम ठेवलेल्या जोफ्रा आर्चरला रिलीज करण्याचा निर्णय घेतला. मुंबई इंडियन्सने रिलीज केलेल्या ११ खेळाडूंपैकी पाच खेळाडू परदेशी खेळाडू आहेत. यापैकी काहींनी पुन्हा एकदा लिलावासाठी नोंदणी केली आहे, मात्र इंग्लंडच्या जोफ्रा आर्चरने आयपीएल २०२४मधून पूर्णपणे दूर राहण्याचा निर्णय घेतला आहे. त्याने ट्वेंटी-२० वर्ल्डकपच्या तयारीसाठी हा निर्णय घेतल्याचे वृत्त समोर येत आहे.

१९ डिसेंबरला होणाऱ्या लिलावासाठी स्टार खेळाडूंसह एकूण ११६६ जणांनी नावे नोंदवली आहेत, परंतु जोफ्रा आर्चरचे नाव या यादीतून गायब आहे. आर्चरला ट्वेंटी-२० वर्ल्डकप २०२२ व वनडे वर्ल्ड कप २०२३मध्ये दुखापतीमुळे खेळता आले नव्हते. आता ट्वेंटी-२० वर्ल्डकप २०२४साठी फिट राहण्याकरिता त्याला आयपीएल २०२४मधून दूर राहण्याचा सल्ला इंग्लंड व वेल्स क्रिकेट बोर्डाने दिला आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचे कुस्ती स्पर्धेत यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयाने रायगड कुस्तीगीर संघ व ना.बा. हायस्कूल जुनियर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आवास (अलिबाग) येथे आयोजित राज्यस्तरीय ग्रीको रोमन रेसलिंग टूर्नामेंटमध्ये यश संपादन केले आहे.



या कुस्ती स्पर्धेत महाविद्यालयातील अकाउंट व फायनान्स विभागातील द्वितीय वर्षाच्या विशाल पुजारी याने रौप्यपदक पटकाविले. विशालच्या यशात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व प्राध्यापक, जिमखाना प्रमुख प्रा. प्रथमेश उदेकर, फिजिकल डायरेक्टर अजिंक्य भगत तसेच इतर सर्व सदस्यांचा मोलाचा वाटा आहे.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी कुस्ती स्पर्धेमध्ये पदक मिळवल्याबद्दल विशाल पुजारीचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# युरो फुटबॉल स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर

## बलाढ्य इटली, स्पेन, क्रोएशिया संघ एकाच गटात

**हॅम्बर्ग (जर्मनी) : वृत्तसंस्था**

पुढील वर्षी जून-जुलैमध्ये जर्मनीत होणाऱ्या युरो अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेची कार्यक्रमपत्रिका जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार गतविजेते इटली, दोन वेळचे विजेते स्पेन आणि गतवर्षीच्या विश्वचषकातील उपविजेते क्रोएशिया या बलाढ्य संघांचा समावेश असलेला ब-गट हा 'ग्रुप ऑफ डेथ' म्हणजेच सर्वांत अवघड गट मानला जात आहे. या गटात अल्बेनियाचाही समावेश आहे.

यजमान जर्मनीच्या संघाने गेल्या काही काळात निराशाजनक कामगिरी केली आहे, मात्र नवे प्रशिक्षक ज्युलियन नागेल्समन यांच्या मार्गदर्शनाखाली मायदेशात होणाऱ्या युरो स्पर्धेत चमकदार कामगिरीचा जर्मनीचा मानस आहे. जर्मनी संघाचा अ-गटात समावेश असून त्यांना स्कॉटलंड, हंगेरी आणि स्वित्झर्लंडचे आव्हान असेल. याचबरोबर १९६६ सालापासून मोठ्या स्पर्धेत विजेतेपदाच्या शोधात असलेल्या इंग्लंडला क-गटात डेन्मार्क, स्लोव्हेनिया आणि सर्बियाचा सामना करावा लागेल. गेल्या स्पर्धेत इंग्लंडला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते.

युरो स्पर्धेला पुढील वर्षी १४ जूनपासून सुरुवात होणार असून सलामीची लढत जर्मनी आणि स्कॉटलंड यांच्यात रंगणार आहे. अंतिम लढत १४ जुलै रोजी होईल. या स्पर्धेसाठी आतापर्यंत २४पैकी २१ संघ निश्चित झाले असून उर्वरित तीन संघ मार्चमध्ये पात्रता फेरीनंतर मिळतील.

# कॅरम : सर एली कदुरी स्कूल सुपर लीगमध्ये

**मुंबई : प्रतिनिधी**

दक्षिण मुंबई विभाग प्राथमिक फेरीमधून सर एली कदुरी स्कूल माझगाव संघाने कामगार महर्षी स्व. गं.द. आंबेकर स्मृती चषक विनाशुल्क आंतर शालेय सुपर लीग कॅरम स्पर्धेत प्रवेश केला. आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी व राष्ट्रीय मिल मजदूर संघ आयोजित दक्षिण मुंबई विभाग निर्णायक फेरीमध्ये सर एली कादुरी स्कूलने भायखळ्याच्या अँटोनियो डिसोझा हायस्कूलचा ३-० असा पराभव करून सुपर लीग पात्रता फेरी गाठली. डिसोझा हायस्कूलला दक्षिण मुंबई विभागाच्या उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

सर एली कदुरी स्कूलविरुद्धच्या सामन्यात डिसोझा हायस्कूलच्या मंथन घोडेकरने पहिले दोन बोर्ड जिंकून ८-० असा छान प्रारंभ केला, परंतु त्यानंतर अचूक सोंगट्या टिपणाऱ्या सार्थक मोहितेने १३-८ असा विजय मिळवित सर एली कदुरी स्कूलला १-० अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर एकेरीच्या सामन्यात मयूर गोरेगावकरने आदित्य शेरकरला १४-२ असे, तर याकुब मुल्लाने अथर्व देवकरला १२-० असे नमवून सर एली कादुरी स्कूलच्या विजयावर ३-० असे शिक्कामोर्तब केले.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com